पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध

RNINO.MAHMAR/2013/57952

शुक्रवार, दि. १९ जून २०२६ | वर्ष : १४ | अंक : ०५६ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ मनपा भवनावर खासगीकरणाच्या दुकानाचा फलक लावा

४ शेतकऱ्यांचे डोळे लागले आभाळाकडे; खरीप लांबणीवर

५ तीन पोलीस कर्मचारी लाच घेताना जेरबंद

पान ८ वर




# ‘ऑपरेशन टायगर’चा मुंबई महापालिकेत शिरकाव

# ठाकरेसेनेचे ४२ नगरसेवक संपर्कात असल्याचा दावा

जनप्रवास : प्रतिनिधी

महानगरी प्रतिनिधी

मुंबई : मुंबई महापालिकेच्या राजकारणात सध्या मोठी खळबळ उडाली असून कथित ‘ऑपरेशन टायगर’ मुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील काही माजी नगरसेवक सत्ताधारी भाजप आणि एकनाथ शिंदे शिवसेनेच्या संपर्कात असल्याच्या चर्चांनी महापालिकेतील सत्ता समीकरणांबाबत नवा सस्पेन्स निम र्ण केला आहे. या पार्श्वभूमीवर आता भाजप आणि ठाकरे गटामध्ये आरोप–प्रत्यारोपांची जोरदार लढत रंगली आहे.





मुंबई महापालिकेतील सभागृह नेते गणेश खणकर यांनी शिवसेना ठाकरे पक्षावर जोरदार निशाणा साधत मोठा दावा केला. गेल्या चार महिन्यांत विरोधी पक्ष म्हणून शिवसेना ठाकरे पक्षाने कोणत्याही महत्वाच्या धोरणात्मक मुद्द्यावर ठोस भूमिका घेतली नसल्याचा आरोप त्यांनी केला. सभागृहात फक्त गोंधळ घालणे हा त्यांचा एकमेव अजेंडा आहे, असे खणकर म्हणाले. यावेळी त्यांनी शिवसेना ठाकरे सेनेच्या नेत्यांवर उपरोधिक टीकाही केली. माजी महापौरांचा भरणा असूनही त्यांच्याकडून प्रगल्भ चर्चा दिसत नाही. पैठणी, पुरणपोळी आणि चटणी याच विषयांवर त्यांचे अधिक लक्ष असते, असा टोला लगावत त्यांनी राजकीय वातावरण अधिक तापवले.

यापुढे आणखी मोठा दावा करत खणकर म्हणाले की, शिवसेना ठाकरे पक्षातील अनेक सदस्य आपल्या राजकीय भवितव्याबाबत साशंक आहेत. पक्षात प्रचंड घुसमट सुरू आहे. सभागृहात अनेक सदस्य नजरेतून आमच्याशी संपर्क साधतात आणि सोबत येण्याची इच्छा व्यक्त करतात. आमचा आकडा नक्की वाढणार आहे. सध्या फॉर्म्युला सांगणार नाही, पण थोडे थांबा पुढे बघा. भाजपच्या या दाव्यांवर शिवसेना ठाकरे पक्षाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी तितक्याच आक्रमक शैलीत प्रत्युत्तर दिले.

गणेश खणकर यांना आकड्यांचा खेळ चांगलाच जमत आहे. दुसऱ्यांचे पक्ष फोडणे आणि वरिष्ठांना खूश ठेवणे हेच त्यांना दिलेले काम दिसत आहे, असा जोरदार पलटवार त्यांनी केला.

पेडणेकर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, आमच्या काही नगरसेवकांशी संपर्क सुरू असल्याची आम्हाला पूर्ण माहिती आहे. पण ज्यांना जायचे आहे त्यांनी खुशाल जावे. आम्ही कुणालाही अडवणार नाही. एक–दोन नगरसेवक गेल्याने शिवसेना ठाकरे पक्षाला काहीही फरक पडणार नाही. आमचे निष्ठावान कार्यकर्ते आणि नगरसेवक आजही आमच्यासोबत ठाम उभे आहेत. त्यांनी सत्ताधाऱ्यांवर गंभीर आरोप करत म्हटले की, फोडाफोडीचे हे राजकारण मुंबईकर जनता उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. योग्य वेळी मतपेटीतून त्यांना याचे उत्तर मिळेल.

दरम्यान , एकनाथ शिंदे शिवसेनेचे किरण लांडगे यांनी,आणखी एक मोठा दावा करत सांगितले की, खासदारांच्या पक्षप्रवेशानंतर आता अनेक नगरसेवकही संपर्कात आहेत. निश्चित लक्ष्य पूर्ण झाल्यानंतरच अधिकृत प्रवेश जाहीर केला जाईल. सध्या तब्बल ३० ते ४२ नगरसेवकांशी विविध स्तरांवर चर्चा सुरू आहे, असा दावा त्यांनी केला.

## पुणे–सातारा महामार्गावरील प्रवास होणार सुसाट

### ‘एनएचएआय’कडून आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : पावसाळ्यात महामार्गावर पाणी साचणे, दरडी कोसळणे यासह इतर अनेक आपत्कालीन घटना घडतात. यामुळे अपघात घडण्यासह मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊन वाहनचालकांचे हाल होतात. आता यावर उपाययोजनांचे पाऊल भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) उचलले आहे. प्राधिकरणाने पुणे ते सातारा महामार्गावर पावसाळापूर्व कामे पूर्ण करून आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा सज्ज केली आहे. यामुळे यंदाच्या पावसाळ्यातील प्रवास अधिक सुरक्षित आणि विनाअडथळा होणार आहे.

पुणे ते सातारा महामार्ग १४१ किलोमीटर लांबीचा असून, तो सहापदरी आहे. पावसाळ्यात अतिवृष्टी झाल्यास महामार्गावर मोठ्या प्रमाणात पाणी साचते. याचबरोबर दृश्यमानता कमी झाल्याने अपघात होण्याचा धोका वाढतो. हा धोका कमी करण्यासाठी महामार्गावर थर्मोप्लास्टिकने मार्गिका आखण्यात आली आहे. त्यामुळे महामार्गावरील मार्गिका प्रतिकूल हवामानातही स्पष्टपणे दिसू शकतील. महामार्गावर पावसाळापूर्व दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. याचबरोबर सुरक्षात्मक उपाययोजनांवर भर देण्यात आला असून, आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे, अशी माहिती प्राधिकरणाच्या वतीने देण्यात आली आहे.

प्राधिकरणाने पुणे–सातारा महामार्गावर पावसाळापूर्व सर्वेक्षण केले आहे. त्यात सूचना फलक, क्रॅश बॅरियर, कठडे आणि डोंगर उतारांचे सर्वेक्षण करण्यात आले. तसेच, महामार्गावरील झाडांच्या धोकादायक फांद्याची छाटणी करण्यात आली आहे. महामार्गांच्या परिसरातील नाल्यांतील गाळ काढून त्यांची सफाई करण्यात आली आहे. पावसाचे पाणी विनाअडथळा वाहून जावे यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

## संक्षिप्त

### एकतर्फी प्रेमातून तरुणीवर कोयत्याने हल्ला

पुणे (जनप्रवास) : एकतर्फी प्रेमातून पालघर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल सहायक म्हणून नोकरी करणाऱ्या तरुणीवर एकाने कोयत्याने वार केले. मानेवर तीन आणि पोटावर चार असे सात वार तिच्यावर करण्यात आले असून, मज्जारज्जूला गंभीर इजा झाली आहे. तिच्यावर सध्या पुण्यातील खासगी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून प्रकृती चिंताजनक आहे.

या प्रकरणी पालघर पोलिसांनी तरुणाविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे. याबाबत तरुणीच्या चुलत्याने फिर्याद दिली आहे. तरुणीच्या हल्ल्याचा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. ही घटना १२ जून रोजी सायंकाळी सव्वासहा वाजताच्या सुमारास पालघर येथील गोल्ड टॉकीजच्या जवळील रस्त्यावर घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तरुणी मुळची माण (जि. सातारा) तालुक्यात राहणारी आहे. तर आरोपी हा बीड जिल्ह्यातील. दोघेजण स्पर्धा परिक्षेची तयारी करत असताना एकाच क्लासमध्ये होते. ऑक्टोबर २०१५ मध्ये तरुणीची पालघर येथे महसुल सहायक म्हणून निवड झाली. तर तरुण उच्च न्यायालय येथे लिपीक म्हणून नोकरीला लागला. एकतर्फी प्रेम करणाऱ्या तरुणाने तिला लग्नासाठी मागणी घातली होती. मात्र, तिने नकार दिला. त्यामुळे तिने एक महिन्यापासून त्याच्याशी बोलणे बंद केले होते. ११ जून रोजी तरुणी घराकडे पायी चालत निघाली होती. त्यावेळी रस्त्यात अडवून तरुण तिला त्रास देऊ लागला होता. त्यावेळी ‘तू जर मला परत भेटला तर मी पोलिसात तक्रार करेन,’ असे तरुणीने त्याला सांगितले. दुसऱ्या दिवशी काम संपल्यानंतर रस्त्याने पायी चालत निघाली असताना तरुणाने तिला पाठलाग करून गाठले. काही कळण्याच्या आत त्याने तिच्यावर कोत्याने हल्ला केला. गंभीर जखमी झाल्याने ती रस्त्यात कोसळली. त्यानंतर तरुण तेथून पळून गेला. स्थानिकांनी तिला सुरूवातीला सरकारी रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पालघर येथील एका खासगी रुग्णालयात तिच्यावर उपचार करण्यात आले. मात्र, मज्जारज्जूला गंभीर इजा झाल्याने तिला पुण्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले. दोन दिवसापूर्वी तिच्यावर एक शस्त्रक्रिया झाली आहे. परंतु, अद्याप ती शुद्धीवर नसून, तिची प्रकृती चिंताजनक आहे. हल्ला केल्याची माहिती तिच्या एका मैत्रीणीने चुलत्यांना दिली.

## सायबर फसवणूक झालेल्यांसाठी डिजिटल यंत्रणा

### रक्कम परत मिळवण्यासाठी २ पोर्टल्स

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई: सायबर फसवणुकीला बळी पडलेल्या नागरिकांची अन्य खात्यांमध्ये वळविली गेलेली रक्कम सुलभतेने परत मिळविण्यासाठी आणि गोठविलेली बँक खाती पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाच्या भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राने दोन अत्याधुनिक डिजिटल पोर्टल्स सुरू केली आहेत. ‘ग्रीव्हन्स रिड्रेसल मेकॅनिझम’ (जीआरएम) आणि ‘मनी रिस्टोरेशन मॉड्यूल’ (एमआरएम) या पोर्टल्समुळे याबाबतची प्रक्रिया अधिक सुलभ होणार असून जलद आणि पारदर्शक पद्धतीने फसवणूक झालेल्यांना न्याय मिळू शकेल.

अनेकदा सायबर फसवणुकीची रक्कम गोठवूनही ती परत मिळण्यासाठी तक्रारदाराला न्यायालय, बँकेच्या पायऱ्या झिजवाव्या लागायच्या. न्यायालयाच्या आदेशानंतरही





बँकांच्या आडमुठेपणामुळे पैसे खात्यात परत येत नाहीत. या अडचणी सोडविण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या दोन्ही पोर्टल्सच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुंबई कार्यक्षेत्रातील सर्व सायबर पोलीस ठाणी तसेच स्थानिक पोलीस ठाण्यांतील कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्याची माहिती सायबर गुन्हे विभागाने दिली. या यंत्रणेमुळे पोलीस, बँका आणि राष्ट्रीय सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल यांच्यात थेट समन्वय साधला जाणार आहे.

## पुणे जिल्ह्यातील मतदार पुनरीक्षणाला ३० जूननंतर सुरुवात

### जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची माहिती

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : जिल्ह्यातील मतदार सखोल पुनरीक्षणाच्या कार्यक्रमाला (एसआयआर) येत्या ३० जूनपासून प्रारंभ होणार असून त्यासंदर्भातील संपूर्ण तयारी पूर्ण झाली आहे. याअंतर्गत दिव्यांग, तृतीयपंथी, आदिवासी वर्गासाठी विशेष मोहीम राबविली जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

दरम्यान, येत्या शनिवारपासून (२० जून) जिल्ह्यातील मतदान केद्रस्तरीय अधिकाऱ्यांना (बीएलओ) ‘एसआयआर’च्या कामांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार असून जिल्ह्याची भौगोलिक व्याप्ती पहाता ५५ टक्के मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाल्याचा दावाही डुडी यांनी केला.



केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी बुधवारी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक घेतली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत डुडी यांनी ही माहिती दिली. दरम्यान, ही मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी प्राधान्याने मतदार केंद्र प्रतिनिधींची नेमणूक करावी, असे आवाहनही डुडी यांनी केले. निवडणूक उपजिल्हाधिकारी मीनल कळसकर यावेळी उपस्थित होत्या.

डुडी म्हणाले, ‘पात्र मतदारांचे मतदारयादीत नाव समाविष्ट असावे आणि अपात्र मतदारांचे नाव यादीतून वगळण्यात यावे यासाठी ही मोहीम राबविली जाणार आहे. सन २००२–२००४ मध्ये अशी मोहीम (एसआयआर) राबविण्यात आली होती. यंदा ‘एसआयआर’मध्ये प्रथमच तृतीयपंथी, दिव्यांग तसेच आदिवासी वर्गातील व्यक्तींच्या नोंदींसाठी विशेष मोहीम राबविली जाईल. याअंतर्गत बीएलओ येत्या ३० जूनपासून घरोघरी जाऊन मतदारांना अर्ज वाटप करणार आहेत. अर्ज वाटप करताना त्या संबंधित मतदार, त्याच्या कुटुंबियांचा घराचा पंचनामा करून त्याची माहिती आणि छायाचित्र घेतले जाईल. जिल्ह्यातील प्रत्येक मतदाराच्या घरापर्यंत पोहोचून अर्ज देण्याचा प्रयत्न आहे.’

## येरवडा मनोरुग्णालयातील गैरव्यवहारप्रकरणी १४ जणांवर ठपका

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : येरवडा येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात २०१७ ते २०२५ या कालावधीत झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहार आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनप्रकरणी आरोग्य विभागाकडून मोठी कारवाई करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून समजते.

याप्रकरणी तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक, आहरण व संवितरण अधिकारी यांच्यासह एकूण १४ अधिकारी व कर्मचाऱ्यांना जबाबदार धरण्यात आले. संबंधितांकडून अपहार केलेल्या रकमेची कालबद्ध वसुली करण्याचे आदेश देण्यात आले असून, या कालावधीतील सर्व अतिरिक्त संचालक (मनोरुग्णालय) आणि उपसंचालक, पुणे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी दिले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या इतिहासात वरिष्ठ अधिकाऱ्यांवर इतक्या थेट आणि कठोर स्वरूपाची कारवाई होण्याची ही पहिलीच घटना मानली जात आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदींनुसार या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली. त्यानंतर एकूण १४ अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्यात आली आहे. असून, संबंधितांवर आर्थिक जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. शासकीय निधीचा अपहार आणि मनोरुग्णांच्या हक्कांवर गदा आणल्याच्या गंभीर आरोपांमुळे या कारवाईकडे राज्यभरातील वैद्यकीय क्षेत्राचे लक्ष लागले आहे. दोषींकडून थेट आर्थिक वसुलीचे आदेश दिल्याने अन्य अधिकाऱ्यांचेही धाबे दणाणले आहे.

## मिठाई विक्रेत्यांकडून ‘एक्सपायरी डेट’ पदार्थांची विक्री

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : वडगावशेरी येथील ’गुरुनानक डेअरी अँड स्वीट्स’मधून खरेदी केलेले पेढे खाल्ल्यानंतर १८ हून अधिक जणांना विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना नुकतीच समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर, शहरातील विविध भागांतील स्थानिक मिठाईच्या दुकानांमध्ये जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली असता, धक्कादायक वास्तव समोर आले आहे. शहरातील केवळ काही नामांकित आस्थापने वगळता, बहुतांश मिठाई दुकानदार, स्वीट शॉप्स, डेअरी आणि बेकरीचालकांनी ’एक्सपायरी डेट’च्या नियमाला पूर्णपणे हरताळ फासल्याचे दिसून आले. अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीचा कोणताही धाक नसल्यासारखे हे दुकानदार थेट ग्राहकांच्या आरोग्याशी खेळत आहेत.

वडगावशेरी येथे झालेल्या विषबाधेत दोन लहान मुलांसह अनेकांना उलट्या, जुलाब, पोटदुखी आणि तीव्र अशक्तपणाचा त्रास झाला. विषबाधा झालेल्यांपैकी पाच जणांना तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले असून, त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार करण्यात आले. या गंभीर घटनेनंतर शहरातील मिठाई आणि डेअरी उत्पादनांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## शरद पवारांचे खासदार संसदेत सरकारच्या बाजूने येणार ?


### राष्ट्रवादीतील फोडाफोडी रोखण्यासाठी पवित्रा

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई: मतदारसंघ फेररचना आणि महिला आरक्षण विधेयक पारित व्हावे, यासाठी भारतीय जनता पक्ष येणाऱ्या प्रत्येक खासदाराचे स्वागत करीत आहे. महाराष्ट्रात शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसने या दोन्ही विशेषतः महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा द्यायची तयारी दाखवली असल्याने या पक्षात कोणतीही अस्वस्थता निर्माण करण्याचा भाजपचा विचार नसल्याचे विश्वसनीयरीत्या समजते.

राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही खासदारही सत्ताधारी युतीच्या दिशेने पावले टाकण्यास तयार आहेत. मतदारसंघातील विकासकामांना गती मिळत असेल, तर भूमिका बदलण्यास हरकत नाही, असे किमान ४ ते ५ खासदारांना वाटते. मात्र, पक्ष नेतृत्वाचा शब्द विधेयकाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत करायचा असल्याने त्या पक्षात कोणतीही हालचाल ना घडवली जाणार आहे, ना घडणार आहे, असे समजते.

भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला २०१९ मध्ये बहुमत मिळाले तरी सत्तेपासून दूर ठेवणाऱ्या महाराष्ट्रातील दोन प्रादेशिक पक्षांबद्दल अढी आहे. त्यावेळी आव्हान देणाऱ्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांची शकले झाल्यानंतरही घडलेल्या खासदारांच्या पक्षफुटीसंदर्भातील घटना याही दोन्ही विधेयके पारित होण्यासाठी मदतशीर ठरणार आहेत.



शिवसेनेतील काही अतिवरिष्ठ नेत्यांनी आमचे सर्वात महत्त्वाचे नेतेही विधेयकाबद्दल शब्द देतील, अशी तयारी भाजपच्या नेत्यांना दाखवली होती, पण आम्ही आता उद्धव ठाकरे यांच्या शब्दावर विश्वास ठेवू शकत नाही, असे भाजपच्या दिल्लीस्थित नेत्यांनी कळवल्याचे समजते. शिवसेनेने ज्या पद्धतीने टीका केली, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वडिलांवरही टीका केली ते लक्षात घेता आता झाले गेले विसरून पुढची एकत्र वाटचाल अशक्य आहे, असे भाजपचे मत आहे.

मतदारसंघ फेररचना विधेयकाला विरोध न करण्याचा राष्ट्रवादीचा शब्द आगामी काळातील पुढच्या २० वर्षांच्या राजकारणाचा पट लक्षात घेता, भाजपला मतदारसंघ फेररचना प्रत्यक्षात आणायची आहे. त्यासाठी आवश्यक असलेले दोनतृतीयांश संख्याबळ भाजपला हवे आहे. आम्ही या विधेयकाबाबत विरोधी मतदान करणार नाही, असा शब्द राष्ट्रवादी काँग्रेसने दिला असल्याची जोरदार चर्चा आहे. भाजपमधील वरिष्ठ सूत्रांनी या विधेयकांना राष्ट्रवादी शरद पवार गटाचा विरोध नसेल एवढेच सध्या बोलतो,’ असे बोलताना सांगितले. या संबंधित योग्य चर्चा झाल्या आहेत, असेही समजते.



# अग्रलेख : भाजपचे सुडाचे राजकारण कुठपर्यंत...?

सन २०१९ ची विधानसभा निवडणूक भाजप आणि शिवसेनेने एकत्र लढविली होती. दोन्ही पक्षांच्या संयुक्त प्रचारसभा झाल्या. दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या विरोधात मतदान करण्याचे आवाहन मतदारांना केले. मतदारांनी युतीला बहुमत प्रदान केले. युतीने सरकार स्थापन करावे हाच मतदारांचा कौल होता, परंतु निवडणूक निकालानंतर आकड्यांचा खेळ मांडल्या गेला. मुख्यमंत्रीपद प्रतिष्ठेचे केले गेले. भाजप आपल्याला मुख्यमंत्रीपद देणार नाही, हे लक्षात आल्यावर शिवसेनेने जनादेश धुडकावून ज्यांच्या विरोधात त्यांनी निवडणूक लढविली होती त्यांच्याच सोबत आघाडी केली. महाराष्ट्रातील राजकीय सूडनाट्याची ती पायाभरणी ठरली. तब्बल १०५ आमदार निवडून आल्यावरही भाजपला विरोधी बाकावर बसावे लागले.

दरम्यानच्या काळात भाजप बराच बदलला होता. अटलजींच्या काळातील सुसंस्कृत, सोशिक वगैरे असलेला भाजप आता मोदी-शहांच्या काळात राजकारणाला युद्ध मानणारा आणि ते जिंकण्यासाठी कोणत्याही स्तराला जाण्याची तयारी असणारा प्रचंड व्यावहारिक भाजप झाला होता. शिवसेनेने आणि त्यातही उद्धव ठाकरेंनी दिलेले अपमानाचे घोट भाजप मुकाट्याने गिळणार नव्हताच. झालेल्या अपमानाचा सूड भाजपला उगवायचा होता. त्याची पटकथा तयार करण्यात आली, नियोजन झाले आणि अचूक मुहूर्त साधत भाजपने उद्धव ठाकरेंचा पक्षच फोडला. केवळ पक्षच फोडला नाही तर ठाकरेंचे सरकारही घालविले. सूडाची आग एवढ्यावरच शांत झाली नाही.

पुढील काळात विधानसभा अध्यक्ष, निवडणूक आयोग आदींना हाताशी धरत उद्धव ठाकरेंकडून पक्षाचे नाव आणि चिन्हदेखील काढून घेण्यात आले. निवडणूक आयोगाने शिंदे गटाला अधिकृत शिवसेना म्हणून मान्यता दिली आणि ती अजूनही कायम आहे. सर्वोच्च न्यायालयात या संदर्भातील प्रकरण गेल्या चार वर्षांपासून प्रलंबित आहे. दरम्यान पुढच्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने दमदार कामगिरी केली. ठाकरे गटाचे नऊ खासदार निवडून आले. शिंदि गटाला सात जागांवर यश मिळाले. या निवडणुकीत ठाकरे गटाने एकप्रकारे शिदिंवर मात केली, परंतु त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत ठाकरे गटाची पार वाताहत झाली.

सूडाचा प्रवास सुरूच होता. पुढचे लक्ष्य मुंबई महापालिका होती. मुंबई महापालिकेला शिवसेनेची जीवनदायिनी म्हटले जायचे. ठाकरे गटाची आर्थिक रसद तोडण्यासाठी मुंबई महापालिका ताब्यात घेणे भाजपसाठी गरजेचे होते. भाजपने आपली सगळी ताकद पणाला लावली आणि इथेही ठाकरे गटाला परास्त केले. पुढच्या टप्प्यात ठाकरे गटातील खासदारांना लक्ष्य करण्यात आले. 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा खूप आधीपासूनच सुरू होती. परंतु किमान सहा खासदार एकाच वेळी गळाला लागणे आवयक होते. तो आकडा जुळला आणि 'ऑपरेशन' पार पडले. याची कुणकुण ठाकरेंना लागल्यामुळेच त्यांनी रविवारी आपल्या सगळ्या खासदारांची बैठक बोलावली होती. त्या बैठकीला प्रत्यक्षात चारच खासदार उपस्थित होते, उर्वरित पाच लोकांनी 'ऑनलाईन' हजेरी लावल्याचे सांगण्यात आले. तेव्हाच लवकरच काही तरी मोठ्या घडामोडी घडणार याची शंका आली होती.

अखेर दोन दिवसांत ठाकरे गटाच्या खासदारांमध्ये फूट पडल्याचे स्पष्ट झाले. नऊ पैकी सहा खासदारांनी नुकतेच लोकसभाध्यक्षांकडे स्वतंत्र गट स्थापन करण्यासंदर्भात पत्र दिल्याचे उघड झाले. त्यांची ही विनंती तातडीने मान्य करण्यात आली आणि आता हा गट लवकरच शिंदेच्या शिवसेनेत सामील होईल. वास्तविक हे काही एका दिवसात झाले नाही. याची सुरुवात गेल्या अनेक महिन्यांपासून सुरूच होती. परंतु हे खासदार मात्र निष्ठेचा पुतळा असल्याचे दाखवत होते. त्यांनी उद्धव ठाकरेंसोबतच्या बैठकीत आई-बापाच्या, तुळजाभवानीच्या, साईबाबांच्या आणाभाका घेतल्या. तेच खासदार पलटतील याची कल्पना कदाचित ठाकरे गटाच्या नेत्यांना आली नसावी किंवा आली असली तरी इतक्या लवकर हे लोक पलटतील याचा अंदाज त्यांना आला नसावा.

याबाबत संजय राऊत, अनिल देसाई वगैरे नेतेमंडळी दिल्लीत दाखल झाली. त्यांनी लोकसभा अध्यक्षांकडे भेटीची परवानगी मागितली, त्या आधी अनिल देसाई यांनी ठाकरे गटाच्या बैठकीसाठी 'व्हीप' बजावला; पण परतीचे दोर कापलेल्या खासदारांनी तो पाळला गेला नाही. आता कोणते तांत्रिक मुद्दे उपस्थित होऊ शकतात, कोणत्या कायदेशीर खबरदाऱ्या भाजप धुरिणांनी आधीच घेतल्या असतील. वस्तुस्थिती हीच आहे, की ठाकरे गटाची लोकसभेतील खासदारसंख्या सहाने कमी होऊन तीन राहिली आहे आणि शिंदे गटाची खासदार संख्या आता तेरा झाली आहे. हा सूडाचा प्रवास इथेच थांबणारा नाही. आता ठाकरे गटातील आमदारांचीही चर्चा सुरू झाली आहे. फूट पाडून आमदारकी कायम ठेवण्यासाठी किमान १४ आमदारांची गरज आहे. आता पुढच्या काळात हा आकडा जमविण्याचे उद्योग सुरू होतील. हा आकडा जमताच खासदारांच्या वाटेने हे आमदारही शिंदे गटात जाऊन विसावतील. एकूणच विरोधी पक्षांना राजकारणातून संपविण्याचे सुडाचे राजकारण भाजपकडून सुरू आहे. त्यात सन २०१९ च्या उद्धव ठाकरेंच्या महायुतीविरोधातील भूमिकेविरोधात मोदी-शहांचे सूडाचे राजकारण अजून थांबलेले नाही. शिंदेंना फोडले, आता खासदार फुटले, आमदारही फोडून अगदी राजकारणातून संपविण्यापर्यंत जाण्याची या भाजपची तयारी असते, हे पुन्हा एकदा सिद्ध होईल.

# अंतरंग

## मतदार मतदानापुरते; राजकारणाचा सत्ताबाजार!

शिवसेना फुटल्यानंतर कायदेशीर लढाईत लवकर निकाला झाला नसला तरी उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेचे शिवसैनिक मागील लोकसभा निवडणुकीत चेव आल्यासारखे लढले. लोकांनी दोन शिवसेना व एकनाथ शिंदे यांच्याकडे अधिकृत धनुष्यबाण चिन्ह असतानाही ठाकरेंचे उमेदवार निवडून दिले. हे त्यांच्या स्वतंत्र राजकीय विचारसरणीचे कौतुक करण्यासारखेच. महायुती प्रचंड ताकदीने महाविकास आघाडीला जेरीला आणत असताना महाराष्ट्राचा मतदार महाविकास आघाडीच्या पाठीशी उभा राहिला आणि त्यांनी ४८ पैकी ३० जागा काँग्रेस, ठाकरे सेना, शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला दिल्या. मतदारांनी फोडाफोडी आणि मनमानी राजकारणाला झिडकारून घेतलेली ही भूमिका कौतुकास्पद होती. पण त्या कौतुकाचे मातेरे होणाऱ्या घडामोडी पुन्हा वारंवार घडत आहेत. सध्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेची निवडणूक होत आहे. सोलापूर येथे थोरल्या पवारांच्या राष्ट्रवादीचे तीन आमदार महायुतीच्या सोबत आहेत, असे दिसते. सहा ठिकाणी तर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले. नाशिकला ठाकरे सेनेचा उमेदवारच दिसलेला नाही. या पार्श्वभूमीवर ठाकरेंचे सहा खासदार फुटणार ही बातमी फार धक्कादायक नव्हती.

महाराष्ट्रातल्या जनतेचे वैचारिक भरण-पोषण तेजस्वी इतिहास पुरुषांनी व राष्ट्रपुरुषांनी केले आहे. त्यामुळेच इथे सत्तेसाठी अत्यंत सवंग अशा तडजोडी झाल्याचा इतिहास १९९० च्या आधी सापडत नाही. पण त्यानंतर हळूहळू फोडा, झोडा आणि सत्ताकारणाचे राजकारण करा असा सपाटा सुरू आहे. त्यातल्या त्यात २०१४ मध्ये भाजपने मोदी लाटेच्या नावावर सर्वच पक्षांतील इनकमिंगद्वारे राजकीय परिवर्तनाची सुरुवात केली. त्याला २०१९ नंतर याला मोठी गती आली आहे. त्यातल्या त्यात २०२२ मध्ये शिंदेसेना आणि पुन्हा त्या पाठोपाठ राष्ट्रवादी फोडून भाजपने 'सत्तेची महायुती' केली. यात विकासाच्या नावे जनतेच्या मताची प्रतारणा खुलेआम झाली. यामुळेच लोकांनी जाणीवपूर्वक उद्धव ठाकरेंना राजकीय ताकद दिलेली असताना त्यांचे लोक का सोडून जातात या भावनेने मतदार अस्वस्थ होतो.

पूर्वी विरोधी पक्षाच्या विचारांचा आदर केला जात असे. त्यामुळेच त्यावेळच्या सत्ताधारी काँग्रेसच्या तुलनेत अतिशय लहान असलेले प्रजा समाजवादी, जनसंघ, कट्टर डावे, शेका पक्ष, पुढे भाजपा, फुटीर काँग्रेसचे गट यांनी मतदारसंघात लोकांच्या हिताची कामे अडवली जातात अशा तक्रारी केल्याचे ऐकिवात नाही. सत्ताधारी पक्षाने सरसकट विरोधी विचारांच्या लोकप्रतिनिधींचे निधी अडवत त्यांचा छळ केला अशी फार उदाहरणे नाहीत. कारण त्यावेळी लोकशाही व्यवस्था लोकांसाठीच असते अशी ठाम धारणा होती. नाही म्हणायला साखर कारखाना किंवा इतर सहकारी संस्था उभारायच्या असतील तर येता का आमच्या पक्षात असे प्रलोभन काँग्रेस दाखवत असे.

आता परिस्थिती इतकी बदलली आहे की, कार्यकर्ते अथवा समर्थक, विचारांची लढाई लढण्यास तयार नाहीत. राजकारण व्यवसाय झाला. आपला नेता विरोधी पक्षात असल्याने सरकारी तिजोरी खुली होत नाही. मग छोटी-मोठी कंत्राटे मिळणार नसतील, बदल्यांची कामे होणार नसतील तर सत्तापक्षासोबत राहण्यात काय चूक आहे असे कार्यकर्ते विचारू लागले. विरोधी पक्षीयांसाठी विकासनिधीची झारी शुक्राचार्य लाजतील इतकी अरुंद झाली. एखादा मतदारसंघ विरोधी पक्षाकडे असला की तिथले प्रशासनसुद्धा सत्तापक्ष नाराज होऊ नये याची काळजी घेऊ लागले. परिणामी हळूहळू कार्यकर्ते, समर्थक त्या नेत्यापासून दूर जाऊ लागले. परिणामी विरोधात असताना पक्ष चालवणे सोपे राहिलेले नाही. राजकारण आणि लक्ष्मीदर्शन या एकाच नाण्याच्या दोन बाजू झालेल्या असताना ठाकरे सेनेचे नाणे थोडेफार चालते ते बाळासाहेब ठाकरे यांनी केलेल्या पायाभरणीमुळेच. त्यांनी शिवसैनिकांना कार्यक्रम दिला. स्पष्ट भूमिका, निर्भिडपणा आवडल्याने लोकांनी शिवसेना मोठी केली. अन्यथा चंद्रपूर, गोंदिया, नांदेड, परभणी, धाराशीव, धुळे अशा भागात सेना कशाला पोहोचली असती? सेनेचा मतदार प्रबोधनकार ठाकरे यांच्या विचारसरणीमुळे आणि बाळासाहेबांच्या राजकीय भूमिकेमुळे वाढला. त्यातूनच सन १९८५ नंतर मतदारसंघावर जबर पकड असलेले काँग्रेसनेत्यांचे गड डळमळीत झाले ते यामुळेच. पण आता काळ बदलला. तुम्हालाच शिवसेना नको असेल तर मी तरी काय करू, अशा भूमिकेत सेनेचे नेतृत्व उदयास आले आहे. त्यांची भाषा, देहबोली या सर्व गोष्टींना कंटाळली आहे असे दिसत आहे. सहा-सात महिन्यांपूर्वी राज्यात नगरपालिका, नगर पंचायती, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी ठाकरे पिता-पुत्रांनी किती सभा घेतल्या, किती उमेदवारांना आश्वासित केले हे विचारले जाऊ लागले. लोकांना गरज आहे तेव्हा लोकच पक्षाची काळजी घेतील ही मानसिकता कमालीची चिंताजनक आहे. राज्यासमोर अनेक समस्या आहेत, सर्व थरातील नागरिकांचे अनेक प्रश्न आहेत. राज्याची फार घौडदौड चालू आहे असेही नाही. पण सर्व समस्यांवर आवाज उठवला जातोय असे दिसत नाही. समस्याग्रस्त विरोधी पक्षाला दोष द्यायचा? की मतदान झाले आता राजकारणाकडे दुर्लक्ष करून मानसिक स्वास्थ जपा, या संभ्रमात जनता आहे.

**– अस्मिता जोशी**

# एकनाथ शिंदेंची बार्गेनिंग पॉवर वाढणार!

राजकारण

## मुख्यमंत्रीपदाच्या चर्चेने भाजपच्या गोटात चलबिचल

बहुचर्चित 'ऑपरेशन टायगर' शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीयशस्वी करून दाखवल्याने राज्यातील भाजपच्या गोटात काहीशी चलबिचल असल्याचे समजते. दिल्लीतील भाजपश्रेष्ठींच्या आशीर्वादानेच शिंदे यांनी शिवसेना (उबाठा) पक्षाचे नऊपैकी सहा खासदार गळाला लावले. शिंदे या फुटीर खासदारांचे बळ भाजपच्या मागे उभे करणार आहेत. त्यामुळे नजीकच्या काळात त्यांना या धाडसी कामगिरीची (मुख्यमंत्रीपद) बक्षिसी मिळण्याची शक्यता बळावली आहे. शिंदे यांचे राजकीय वजन वाढल्यास त्याला तोंड देताना भाजपच्या राज्यातील नेत्यांना कसरत करावी लागणार असल्याचे बोलले जात आहे.

लोकसभा-विधानसभा मतदारसंघ पुनर्रचना, महिला आरक्षण विधेयक नव्याने मांडून ते मंजूर करून घेण्यासाठी केंद्र सरकारला अधिकाधिक खासदारांच्या पाठिंब्याची गरज आहे. शिंदे यांनी खेचलेल्या सहा खासदारांमुळे एनडीएचे लोकसभेतील संख्याबळ वाढणार असून शिवसेनेच्या खासदारांची संख्या सातवरून १३ होणार आहे. शिवसेनेची 'बार्गेनिंग पॉवर' वाढणार असून, शिंदे त्यांची राज्याचे नेतृत्व करण्याची इच्छा पूर्ण



करण्याची शक्यता वर्तवली जाते.

**भाजपची अळीमिळी गुपचिळी**

'ऑपरेशन टायगर'बद्दल भाजपश्रेष्ठींनी शिंदेंना नेमके काय आश्वासन दिले, हे येत्या काळात स्पष्ट होईल. शिवसेना (उबाठा) संसदीय पक्षात उभी फूट पडल्याचे स्पष्ट झाल्यानंतरही राज्यातील भाजपच्या नेत्यांनी प्रतिक्रिया देण्याचे टाळले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या 'ऑपरेशन'ची कल्पना होती, असे सांगितले जाते. फडणवीस यांनी दिल्लीत दिवसभर घडलेल्या राजकीय घटनांवर मात्र कोणतेही भाष्य केले नाही.

बरोबर चार वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी जून २०२२ मध्ये शिवसेनेत बंड केले होते. त्यानंतर राज्यात युतीचे सरकार स्थापन होताना त्याची धुरा फडणवीस यांच्याकडे जाईल, असा कयास होता. मात्र, प्रत्यक्षात भाजपने शिंदे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आणि त्यांना मुख्यमंत्रिपद मिळाले. ठाकरे गटातील आजच्या फुटीमुळे चार वर्षांपूर्वीच्या घटनाक्रमाला पुन्हा उजाळा मिळाला आहे. अर्थात मागील विधानसभा निवडणुकीतही शिंदे यांचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून निवडणूक लढण्यात आली.

परंतु फडणवीस यांच्या आक्रमक पवित्र्यानंतर एकनाथ शिंदे यांची पुन्हा उपमुख्यमंत्रीपदावर बोळवण करण्यात आली. त्याची सलही त्यांना आहे. त्यांना पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपदाची आशा आहे. त्यादृष्टीने ही घडामोड आता महत्त्वाची आहे. त्यातल्या त्यात भाजपपेक्षा अधिक खासदारांचा पक्ष ही त्यांची मुख्यमंत्रीपदासाठीची बार्गेनिंग पॉवर वाढविणारा आहे.

**अधिकृत घोषणेसाठी २१ जूननंतरच मुहूर्त**

वास्तविक दोन दिवसांत पक्ष विलीनीकरणाचा अधिकृत निर्णय जाहीर करण्यात येणार होता. यासाठी शिवसेनेच्या वर्धापनदिनी १९ जूनला विलीनीकरणाची प्रक्रिया जाहीर करण्याबाबत गांभीर्याने चर्चा सुरू होती. मात्र, काही तांत्रिक गोष्टी शिल्लक असल्याने आता ही घोषणा तत्काळ होणे शक्य नाही. परिणामी विलीनीकरणाची अधिकृत घोषणा २१ जूननंतर जाहीर होईल, असे समजते.

**संजय जाधव यांना केंद्रात राज्यमंत्रिपद?**

शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या खासदारांच्या या गटाने एकाला केंद्रात राज्यमंत्रिपद देण्याची मागणी केली होती. त्यावर, राज्यमंत्रिपद देऊ, असा शब्द शिवसेना नेतृत्वाने दिला होता. त्यानुसार खासदार संजय जाधव यांच्या गळ्यात ही राज्यमंत्रीपदाची माळ पडणार असल्याची चर्चा आहे.

### डॉ. श्रीकांत शिंदे यांचा पुढाकार; मे पासून व्यूहरचना!

खासदार फोडण्याच्या प्रक्रियेमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी पुढाकार घेतला होता. लोकसभा अध्यक्षांसोबतचा सर्व संवादही त्यांनीच पार पाडल्याचे समजते. हे खासदार वेगवेगळ्या मार्गाने दिल्लीत कसे पोहोचतील, याची जबाबदारी मात्र एकनाथ शिंदे यांनी पार पाडल्याचे कळते. यासाठी खासदारांशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची महिन्याभरापासून चर्चा सुरू होती. पक्षांतरबंदी कायद्याखाली कारवाई होऊ नये, यासाठी सहा खासदारांचा गट तयार करण्याबाबत घडामोडी सुरू होत्या. मे महिन्याअखेरीस बैठकांना पुन्हा सुरुवात झाली. अखेर या सहा बंडखोर खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन करण्याबाबतचे पत्र मंगळवारीच लोकसभा अध्यक्षांना दिले होते.

## पंचांग

विक्रम संवत्- २०८२ निज ज्येष्ठ शके संवत्- १९४८ संवत्सर - पराभवनाम अयन- उत्तरायणारंभ मास- निज ज्येष्ठ ऋतु- सौर ग्रीष्म शुक्ल पक्ष तिथि : पंचमी १७:००:०६ नक्षत्र : ओषा १०:०६:३६ योग : हर्षण १४:५२:४८ करण : बालव १७:००:०६ करण : कौलव २८:१७:३७+ सूर्य : मिथुन चन्द्र : सिंह१०:०६:३६ हिजरी सन् - १४४८
मुस्लिम मास - मोहरम तारीख - ३ विशेष

## राशी भविष्य...

राशिफल

**मेष** – प्रयत्न केल्यास यश मिळणार आहे. अडकलेला पैसा मिळू शकतो. व्यापारात नवीन प्रस्ताव येतील. मुलांच्या कामाकडे लक्ष राहू द्या. सुखकारक प्रवास घडेल.

**वृषभ** – व्यवसायात अनकुल असे यश मिळेल. कुटुंबामध्ये सुख व शांतीचे वातावरण लाभेल. कोणताही अट्टाहास किंवा मताचा आग्रह अनाठायी ठरेल. एकदम कोणावर विश्वास टाकू नका.

**मिथून** – प्रयत्न केल्यास यश मिळणार आहे. अडकलेला पैसा मिळू शकतो. व्यापारात नवीन प्रस्ताव येतील. मुलांच्या कामाकडे लक्ष राहू द्या. सुखकारक प्रवास घडेल.

**कर्क** – विरोधकांवर मात केल्यामुळे आपल्या किर्तीत वाढ होईल. व्यापाराचे क्षेत्र विस्तृत होईल. जीवन साथीशी चांगले संबंध राहतील. आरोग्याची काळजी घ्या.

**सिंह** – कोणत्यातरी कामात मिळालेले यश आपल्यास फायदेशीर राहणार आहे. घराची अडचण दूर होईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. रागावर नियंत्रण हवे.

**कन्या** – स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचे योग आहेत. नवीन ओळखीमुळे फायदा होईल. दुसऱ्याचे अनुकरण करण्याचे टाळा. व्यापार चांगला चालेल.

**तूळ** – मनोधैर्य खचू न देता काम पूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यास यश मिळेल. व्यापारामधील स्थिती सकारात्मक राहील. तेजी-मंदीच्या व्यवहारापासून दूर रहा.

**वृश्चिक** – मोठ्या परिवर्तनाची शक्यता असल्या कारणाने प्रवास टाळावा. कामात पारदर्शकता राहील. व्यापारात नवीन योजना आमलात येतील. घरगुती सदस्यांना मान सन्मान मिळण्याचे योग आहेत.

**धनू** – योजलेले काम वेळेत पूर्ण होतील. खर्च वाढणार आहे परंतु त्याच प्रमाणे उत्पन्न राहील. प्रत्येक्ष क्षेत्रात मान सन्मान मिळेल. कोणतेही काम जबाबदारीने करा.

**मकर** – आळस झटकून कामाला लागा. व्यावसायिक संबध सुधारतील. परिस्थितीकडे पाहून आपण आपले व्यवहार करा नाहीतर नुकसान संभावते. मनोधैर्ये खचेल.

**कुंभ** – प्रसिध्दी मिळण्याचे योग आहेत. अधिकारी वर्गाकडून सहकार्य मिळेल. मुलांच्य रोजगाराचा प्रश्न सुटणार आहे. दुसऱ्याचा कामात हस्तक्षेप करू नका.

**मीन** – विचारपूर्वक कामे करा. आपली जबाबदारी ओळखा. दैनिक कामात अडथळा निर्माण होऊ शकतो. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक जीवन समाधानी राहील.

## पारावरचा फड

उद्धव ठाकरे सेनेला पुन्हा एकदा धक्का देत सहा खासदारांना फोडण्यात व्हाया भाजप शिंदे सेना यशस्वी झाली. अर्थात यातून डिलिमीटेशन विधेयकासाठी पक्ष फोडीचा बेकायदा उद्योग करण्यात आल्याचा काहीजण आरोप करीत आहेत, तर दुसरीकडे उद्धव ठाकरेंसह अन्य नेत्यांकडून काहीच भवितव्य नसल्याने व विकासकामांसाठी खासदारांचा सहाजणांचा गट फुटल्याचेही आडाखे बांधले जात आहेत. हे काही असो, दुसरीकडे शिंदे यांच्याकडून ६ खासदार फोडत १३ जणांचा मजबूत गट बनवून आपला महायुतीतील खुट्टा घट्ट केल्याचीही चर्चा सुरू आहे. शिवसेना उबाठाकडून पुन्हा बाळासाहेबांच्या जुन्या 'आमदार, खासदार फुटले तर रस्त्यावर हाणा' अशा रिल्स फिरू लागल्यात. त्याच आधारे पुन्हा खासदारांना वाय प्लससह सुरक्षेची व्यवस्था होऊ लागलीय. त्यातच झाडी, डोंगारपाठोपाठ आता काय उंट, काय पॅलेस म्हनत खासदारांना राजिस्थान ट्रीपचीही चर्चा रंगू लागलीय. एकूणच या घडामोडींबाबत पारावरची चर्चा!

**बाबूराव :** शेना कुनाची हेचा मागचा निकाल लागला न्हाय, तवर नव्यानं ठाकरे शेना पुन्यांदा फुटली.

**पांडूनाना :** बदल ह्यो राजकारनातला नवा नियम हाय.

**बाबूराव :** व्हय, पर ह्यो बदल गद्दारी, खोक्यांचा परिनाम दाकवतुया, आन् जनतेनं कुटल्या पक्शाला संदी दिली हे नव्या इलेक्शानपातुर विसरलं जातंया.

**पांडूनाना :** आक्शी बराबर हाय बग. गेल्या तीन टरमात हेच चाललंया.

**बाबूराव :** हे सुरवातीला लोकल इलेक्शानला व्हायाचं, आता खासदार, आमदारांच्या बाबतीत बी सुरु झालंया.

**पांडूनाना :** ते काय का आसंना, आगुदर आमदार फुटलं त्यो आनुभव आसताना खासदार फुटलं तरीबी उद्धोसायबास्नी न कळावं म्हजी हाईटच.

**बाबूराव :** ते काय का आसंना, उद्धोसायब मुंबई आन् मातोशरीभाईर येत न्हायती, भेटत न्हायती ही खंत हायच.

**पांडूनाना :** आता फुटनाऱ्याला काय आडवनार हायती व्हय. आन् हिकडं सत्तेला सगळीच हापापलीत.

**बाबूराव :** आरं त्या डिलिमिटेशन का काय त्येच्यापाई खासदारांचा फोडाफोडीचा भाजपनं बाजार केलाया.

**पांडूनाना :** त्येचा फायदा घेत शिंदे बी आपली शेना मजबूत करत्यात. म्हजी म्हायुतीत फडनवीसांवर कडी..!

**बाबूराव :** उद्या आमदार, नगरशेवक बी फुटत्याल म्हंत्यात. मग आशानं इरोदकास्नी निवडून उपयोग काय?

**पांडूनाना :** आता ह्ये जनतेच्या हातात न्हायलं न्हाय. आन् तिकडं गाडी फुल्ल झाल्यावं घेत्यात कशाला.

**बाबूराव :** आरं सरकारला राज्यात गरदी हाय, शिंदेशेनेत बी गरदी हुईल. मग काय कशाला फोडत्याल?

**पांडूनाना :** तेबी खराय म्हन. त्येंना घेन्यापरास इरोदकातच न्हाऊन सांभायायचं.

**बाबूराव :** आता तेवढंच न्हायलंय.

**– अमृत चौगुले**

## उपदेश कथा

**यशाला 'शॉर्टकट' नाही**

आयुष्यात आपल्याला पुढे जायचे असेल, यशस्वी व्हावयाचे असेल तर भरपूर काबाडकष्ट, परिश्रम करण्याची तयारी हवी. यश तसे मिळत नाही. प्रतिभा म्हणजे दुसरं काही नाही. 'नव्याण्णव टक्के घाम नि एक टक्का राम ।' असे म्हणतात. (जिनीयस इज नाइन्टीनाइन परसेंट... पार्स्पिरेशन ॲन्ड वन परसेंट इन्स्पिरेशन) लेखनाची ढोर मेहनत, काबाडकष्ट यांना सीमा नसते. टॉलस्टॉयने 'वॉर ॲन्ड पीस'सारखी जंगी कादंबरी सात वेळा नव्याने लिहिली आणि त्याच्या पत्नीने न कंटाळता सात वेळा तिची 'फेअर कॉपी' केली! रचना लिहून पुरी झाली की, लेखकाला उमजते - हे असे नाही, असे लिहिले जायला हवे होते. 'रन्वाँ' या प्रसिध्द चित्रपट दिग्दर्शकाने म्हटले होते, 'एखादी फिल्म मी पुरी करतो तेव्हा मला कळते ती कशी करायला हवी होती. (व्हेन यू फिनिश मेकिंग ए फिल्म, यू नो देन हाऊ यू शूड हॅव मेड इट)

**कथा उपदेश : परिश्रमाला पर्याय नाही.**

## दिनविशेष...

**आंतरराष्ट्रीय**

१२६९ - फ्रांन्सचा राजा लुई नवव्याने ज्यू व्यक्तींना जाहीर ठिकाणी पिवळे फडके न घालता आढळल्यास १0 लिव्हचा दंड फर्मावला.
१३०६ - मेथ्वेनची लढाई.
१७७० - इमॅन्युएल स्विडेनबर्गने येशू ख्रिस्त पुन्हा जन्मल्याची नांदी केली.
१८६२ - अमेरिकेने आपल्या प्रांतातील गुलामगिरीची प्रथा बेकायदा जाहीर केली.
१८६५ - अमेरिकेतील गॅल्व्हेस्टन येथील गुलामांना मुक्ती. हा दिवस येथपासून जूनटीन्थ या नावाने साजरा केला जातो.
१८६७ - मेक्सिकोच्या सम्राट मॅक्सिमिलियन पहिल्याला मृत्यूदंड.
१९१२ - अमेरिकेत कामगारांसाठी ८ तासांचा एक दिवस कायदेशीर झाला.
१९४३ - बोमाँट, टेक्सास येथे वांशिक दंगल.
१९५३ - आण्विक हेरगिरी करणाऱ्या ज्युलिअस आणि एतेल रोझेनबर्ग यांना विजेच्या खुर्चित बसवून मृत्यूदंड दिला गेला.
१९६१ - कुवैतला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य.
१९७७ - झिया उल हक पाकिस्तानचे सर्वेसर्वा बनले.
१९७८ - गारफील्ड या कार्टून व्यक्तिमत्त्वाचे वर्तमानपत्रात पदार्पण.
२००२ - पाकिस्तानमध्ये मदरशांची नोंदणी सक्तीची करण्यात आली.

## काटकसरीचा सल्ला फक्त जनतेलाच का?

देशात खरोखरच तेल, पैसा आणि संसाधनांची कमतरता असेल, तर सर्वप्रथम सरकार आणि मंत्रीमंडळाने स्वतः उदाहरण घालून द्यायला हवे. एका मंत्र्याच्या किंवा मोठ्या नेत्याच्या मागे धावणाऱ्या अनेक गाड्या, सुरक्षा ताफे, हेलिकॉप्टर दौरे, रोडशो यावर होणारा खर्च हा सामान्य माणसाच्या नजरेतून सुटत नाही. जनतेला डिझेल, पेट्रोल वाचवण्याचा सल्ला देताना स्वतः मात्र शेकडो वाहनांचा ताफा घेऊन फिरणे, हा दुहेरी मापदंड वाटू शकतो. सरकार नागरिकांना मेट्रोने प्रवास करण्यास, सार्वजनिक वाहतूक वापरण्यास आणि साधेपणा स्वीकारण्यास सांगते. मग देशाचे मंत्री, खासदार आणि वरिष्ठ नेते यांनीही आपल्या ताफ्यात कपात करून साधेपणाचा आदर्श निर्माण करायला हवा. लोकप्रतिनिधींनी स्वतः काटकसरीचा मार्ग स्वीकारला, तर जनतेलाही त्याग करण्याची प्रेरणा मिळेल. अन्यथा हे सर्व फक्त उपदेशापुरतेच मर्यादित राहते. आज सामान्य नागरिक आधीच महागाई, बेरोजगारी, वाढते कर, इंधन दरवाढ आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींनी त्रस्त आहे. दुसरीकडे मोठमोठ्या उद्योगपतींची हजारो कोटींची कर्जे माफ केली जातात, असा आरोप वारंवार केला जातो. त्यामुळे सरकारचा भार पुन्हा सामान्य करदात्यावरच टाकला जात असल्याची भावना लोकांमध्ये वाढत आहे.

**–कौस्तुभ जाधव, सांगली**

## जन की बात...

### प्रशासन व्यवस्थेला तुकाराम मुंढेसारख्या अधिकाऱ्याची गरज

नोकरशहांनी लोकशाहीच्या मजबूत खांबाला भ्रष्टाचाराने पोखरल्याने लाचखोरीच्या बातम्या आपण दर चार आठ दिवसाला प्रसारमाध्यमांमधे वाचतो किंवा ऐकतो. असे असले तरी अजूनही वादळात दिवा लावणारे तुकाराम मुंढे सारखे प्रमाणिक, भ्रष्टाचाऱ्यांना धडकी भरवणारे सनदी अधिकारी आपल्या महाराष्ट्रात आहेत ही अभिमानाची बाब म्हणावी लागेल. २१वर्षाच्या नोकरीत २५ वेळा बदली होऊन सुध्दा आपली प्रामाणिक कार्यशैली कायम ठेऊन मुंढेसाहेबानी आज तरुणाई पुढे एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. त्यांचा हा आदर्शच अधुनिक महाराष्ट्राला पुढे नेण्यासाठी कटीबध्द राहिल. विशेष म्हणजे ते कुठल्याही दबावाला न पडता कर्तव्य कठोर राहुन भृष्टाचारयाना आळा घालतात. लोकशाहीत कायद्याचे राज्य टिकवण्यासाठी, कायद्याविरुध्द काम करणारयावर बडगा उचलताना तत्पर निर्णय घेतात, शासनामध्ये अशा I-S/IPS अधिकाऱ्यांची खर तर आज अत्यंत गरज आहे अशी भावना सर्वसामान्य नागरिकांच्या मनात आहे. जनतेच्या जीवाशी खेळणारयावर कारवाई झालीच पाहिजे, पण जे अधिकारी आपल्या कर्तव्यात हलगर्जीपणा करुन किंवा बेकायदेशीर काम करणाऱ्याबरोबर संगनमत करतात अशांची चौकशी होऊन त्यांच्यावर कठोर कारवाई होणा आवश्यक आहे. लोकप्रतिनिधीशी जुळवून घेण्यासाठी काही वेळा अधिकऱ्यांवर दबाव आणला जातो हाही प्रकार अनेक वर्षापासून चालु आहे व तिथे अधिकारी पण दबावाखाली येतात. परंतु याला अपवाद ठरतात तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिकारी. आज शिक्षण विभाग, सहकार, महसूल, परिवहन, गृह, अन्न औषध अशा अनेक विभागात मुंढे साहेबासारख्या कणखर अधिकाऱ्यांची गरज आहे. आज मुंढे यानी अन्न व औषध (FD) खात्याची जबाबदारी स्विकारताच जनतेच्या जीवाशी खेळणारे ड्रग्ज माफीया, दुध व दुधाच्या पदार्थामधे व अन्नपदार्थांमधे राजरोसपणे भेसळ करणाऱ्यांना चांगलाच धडा शिकवला आहे. तसं पाहिलं तर वर्षानुवर्षे कायदे तेच होते, खुर्च्याही त्याच होत्या मग संबंधित विभागातील अधिकारी काय करत होते? हा सवाल जनतेच्या मनात आल्याशिवाय रहात नाही. म्हणुन अशा भ्रष्ट व्यवस्थेत बदल घडवायचा असेल तर तुकाराम मुंढेसारख्या प्रामाणिक, शिस्तप्रिय व कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची गरज आहे. त्यांचा आदर्श हा इतर अधिकारी विशेषतः तरुण सनदी अधिकारी यानी घेणे ही काळाची गरज आहे.

**– शशिकांत गायकवाड, सांगली**

## 'योग' दैनंदिन जीवनाचा भाग व्हावा !

कोरोना महामारीच्या काळात पुरातन भारतीय संस्कृतीतील आहार विहार, आयुर्वेद यांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले होते. योग हा सुध्दा त्यापैकीच एक. आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढावी तसेच फुफ्फुसासह एकूणच शरीराचे आरोग्य चांगले राहावे यासाठी काही ठराविक योगासने त्या क्षेत्रातील जाणकार मंडळींनी त्यावेळी सुचवली आणि आपण ती आचरणातही आणू लागलो होतो. ज्यांना कोरोना झाला किंवा ज्यांनी कोरोनावर मात केली अशांना योग्य आहार विहार आणि औषधांसोबत प्रतिदिन योग करण्याचा सल्लाही त्यावेळी आरोग्य खात्याने दिला होता. योगविद्या भारतीय ऋषी मुनींनी जगाला दिलेली एक अमूल्य देणगी आहे. आज योगविद्येचे महत्व साता समुद्रापार पोहोचले आहे. मानवाला निरोगी आयुष्यासोबत मनःशांती देणारी योगविद्या खरेतर समस्त मानवजातीसाठी एक संजीवनी ठरली आहे. तिचा भारतीयांनी दैनंदिन जीवनात लाभ करून घेणे आवश्यक आहे. सध्याच्या स्पर्धेच्या युगात कुटुंबाचा चरितार्थ चालवण्यासाठी जीवाची पराकाष्ठा करणारा मनुष्यप्राणी आपल्या आरोग्याकडे मात्र दुर्लक्ष करताना दिसतोय. कामाचा आणि कौटुंबिक समस्यांचा ताण मानवाचे जीवनमान अल्प करत आहे अशावेळी दिवसातून थोडासा वेळ काढून ठराविक योगासने केल्यास मनुष्याचे जीवन सुखकर आणि निरोगी होऊ शकते. योग आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग कसा बनेल यासाठी प्रयत्न करायला हवेत. याबाबत शासनानेही पुढाकार घ्यायला हवा !

**–जगन घाणेकर, मुंबई**

# धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत जनसेवा संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक; आगामी धार्मिक व सामाजिक उपक्रमांचा आराखडा निश्चित

## 'गाव तेथे शाखा' अभियानाला गती देण्याचा निर्धार; कार्यकर्त्यांना संघटन विस्तारासाठी सज्ज राहण्याचे आवाहन

■ **जनप्रवास तालुका प्रतिनिधी**


**इंदापूर :** अकलूज येथील श्रीराम मंदिरात महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीस संघटनेचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत आगामी धार्मिक, सामाजिक आणि जनहिताच्या विविध कार्यक्रमांच्या नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीत दि. २० जून २०२६ रोजी अकलूज येथे आयोजित गुरुवर्य संभाजीराव भिडे गुरुजी यांच्या जाहीर व्याख्यान कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत सखोल चर्चा करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विविध जबाबदाऱ्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये वाटप करण्यात आल्या.

तसेच दि. ०६ जुलै २०२६ रोजी लोकनेते स्व. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या कीर्तन सोहळ्याच्या तयारीचाही आढावा घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर जनसहभाग मिळविण्याबाबत नियोजन करण्यात आले.

यावेळी संघटनेच्या "गाव तेथे शाखा" या पुनर्बांधणी अभियानावर विशेष भर देण्यात आला. संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक गावात संघटनेच्या शाखा कार्यरत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. युवकांना संघटनेशी जोडून सामाजिक कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्याबाबतही चर्चा झाली.

याशिवाय सोपनकाका महाराज यांच्या पालखीचे प्रथमच श्रीराम



मंदिरात आगमन होत असल्याने स्वागत व व्यवस्थापनाबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या. तसेच बीड जिल्ह्यातील उमापूर येथे आयोजित विराट हिंदू जनआक्रोश मोर्चामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही कार्यकर्त्यांना करण्यात

> गुरुवर्य संभाजीराव भिडे गुरुजी यांचे व्याख्यान, इंदुरीकर महाराजांचे कीर्तन, पालखी सोहळा आणि संघटन विस्तार या चार प्रमुख मुद्द्यांवर बैठकीत विशेष चर्चा झाली.

आले.

बैठकीच्या शेवटी आगामी काळात धार्मिक, सामाजिक आणि जनहिताच्या उपक्रमांचे अधिक प्रभावी आयोजन करण्याचा संकल्प करण्यात आला. सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या एकजुटीमुळे संघटना अधिक बळकट होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

# मनपा भवनावर खासगीकरणाच्या दुकानाचा फलक लावा : चेतन पवार

## कडक उन्हात शिवसेनेचा जागर मोर्चा

■ **जनप्रवास प्रतिनिधी**

**पुणे :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दुकानातील आरक्षित भूखंड भाडेतत्त्वावर देत आहोत असा फलक मनपा भवनावर लावावा, तसेच ज्या संस्थेला व ज्या मोठ्या कारभाऱ्यांना याचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी त्वरित लाभ घ्यावा, असेही आवाहन आयुक्त यांनी करावे अशी उपरोधित टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख चेतन पवार यांनी केली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासन आणि शिक्षण विभागात असणारा भ्रष्टाचार आणि भोंगळ कारभाराबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने वेळोवेळी आयुक्तांकडे तक्रार केली आहे. परंतु झोपेचे सोंग घेतलेल्या या प्रशासनाला जागे करण्यासाठी गुरुवारी जागर मोर्च्याचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चानंतर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना चेतन पवार यांनी सांगितले की, पुनावळे येथील मनपा शाळेसाठी आरक्षित भूखंड खासगी संस्थेला देऊ नये. तिथे गोरगरिबांच्या मुलांसाठी मनपाने शाळा सुरू करावी. या मागणीसाठी शिवसेनेच्या वतीने अनेक वेळा आयुक्तांना पत्र देऊन, पत्रकार परिषद घेऊन देखील विरोध दर्शविण्यात आला होता. तरी देखील सोमवारी सर्वसाधारण सभेत तुटपुंज्या रकमेवर ९१ गुंठ्यांचा हा आरक्षित भूखंड ३० वर्षांच्या मुदतीवर नाममात्र भाडेकराराने देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. याला राष्ट्रवादी काँग्रेसने विरोधी पक्ष म्हणून सभागृहात विरोध करायला हवा होता. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा भाजपची बी टीम असल्याने त्यांनी विरोध केला नाही आणि बहुमताच्या जोरावर या प्रशासनाने ठराव मंजूर केला. यासाठी कोणत्या आमदारांचा, वरिष्ठांचा दबाव होता हे आयुक्तांनी जाहीर करावे आणि या मनपा हद्दीतील उर्वरित सर्व भूखंड देखील मोठ्या कारभाऱ्यांना आणि त्यांच्या संस्थेला देण्यासाठी आरक्षित भूखंड भाड्याने देण्याचे दुकान उघडल्याचा फलक मनपा भवनावर लावावा असे चेतन पवार यांनी सांगितले.

या मोर्चामध्ये सर्व निष्ठावंत शिवसैनिक आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैध गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या दोन आरोपींना अटक; तीन पिस्तुले व चार जिवंत काडतुसे जप्त



■ **जनप्रवास प्रतिनिधी**

**जांबूत :** शिरूर पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकाने अवैध गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या दोन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून तीन गावठी बनावटीची पिस्तुले व चार जिवंत काडतुसे असा एकूण १ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण व डी.बी. पथक १४ जून रोजी रात्री गस्त घालत असताना पोलीस अंमलदार नितेश थोरात यांना गोपनीय माहिती मिळाली की, विजय उर्फ कोयत्या गोविंद शेंडगे वय ३१, रा. आमदाबाद, ता. शिरूर हा न्हावरे गावाजवळील बसथांब्याच्या परिसरात पिस्तूल घेऊन फिरत आहे.

या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचून विजय शेंडगे याला ताब्यात घेतले. त्याच्या झडतीत कमरेला लपवून ठेवलेले एक पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे आढळून आली. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम १९५९ च्या कलम ३ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान विजय शेंडगे याने बापू कोंडीबा पारखे वय ३१, रा. सरकेवस्ती, निमोणे, ता. शिरूर याच्याकडे दोन पिस्तुले व दोन काडतुसे दिल्याची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी बापू पारखे यालाही ताब्यात घेऊन त्याच्याकडून दोन पिस्तुले व दोन जिवंत काडतुसे जप्त केली.

दोन्ही आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता १८ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, मुख्य आरोपी विजय उर्फ कोयत्या शेंडगे याच्यावर यापूर्वी खून, जबरी चोरी, विनयभंग व मारहाण यांसारखे गंभीर गुन्हे शिरूर व शिक्रापूर पोलीस ठाण्यात दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक शुभम कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले व पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण व डी.बी. पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# पुण्याची कन्या 'ग्लोबल' शिखरावर; ऋतुजा कुंभार यांची अमेरिकन कंपनीत ऐतिहासिक कामगिरी

■ **जनप्रवास प्रतिनिधी**

**पाटस :** कल्याणी नगर येथील रहिवासी आणि 'एक्सप्रेस आयटी मॅनपॉवर ग्रुप'च्या एचआर विभागातील कर्तबगार तरुणी, ऋतुजा कुंभार हिने आपल्या अफाट कार्यक्षमतेच्या जोरावर संपूर्ण भारतात प्रथम क्रमांक पटकावत महाराष्ट्राचा मान उंचावला आहे. एका अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनीत काम करत असताना तिने मिळवलेले हे यश केवळ पुणेच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी अभिमानास्पद ठरले आहे.

'एक्सप्रेस आयटी मॅनपॉवर ग्रुप' ही कंपनी जगातील सुमारे ५०



देशांमध्ये कार्यरत असून, आयटी क्षेत्रातील मनुष्यबळ पुरवण्यात तिचे नाव अग्रगण्य आहे. आयटी इंजिनिअर्स, सॉफ्टवेअर डेव्हलपर्स आणि आयटी एक्झिक्युटिव्ह अशा महत्त्वाच्या पदांवर हजारो तरुण-तरुणींना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात या कंपनीचा मोठा

> "हे केवळ माझे वैयक्तिक यश नसून माझ्या संपूर्ण टीमचे एकत्रित प्रयत्न आहेत. माझ्या वरिष्ठांचे मार्गदर्शन, आईवडिलांचा आशिर्वाद आणि टीममधील सहकाऱ्यांचा पाठिंबा यामुळेच हे शक्य झाले आहे."
>
> - ऋतुजा कुंभार

वाटा आहे. ऋतुजा कुंभार आणि त्यांच्या टीमने कठीण जागतिक परिस्थितीतही अत्यंत कमी वेळेत कुशल मनुष्यबळ पुरवून कंपनीच्या विस्तारात मोलाची भूमिका बजावली आहे.

ऋतुजा यांच्या या विशेष कामगिरीची दखल घेत कंपनीने त्यांना 'अचिव्हर ऑफ द इयर' या मानाच्या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. त्यांच्या या यशामुळे आयटी आणि एचआर क्षेत्रातील मराठी तरुणांसमोर एक उत्तम आदर्श निर्माण झाला आहे. पुण्याच्या मातीत तयार झालेल्या ऋतुजा कुंभार यांची ही उत्तुंग भरारी अनेक स्वप्न पाहणाऱ्या तरुण-तरुणींसाठी एक नवी उमेद देणारी ठरत आहे.

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, इनोव्हेशन, शैक्षणिक गुणवत्तेला 'सूर्यदत्त'मध्ये प्राधान्य : प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन

■ **जनप्रवास प्रतिनिधी**

**पुणे :** सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड मास कम्युनिकेशन (एसआयएमएमसी), पुणे या संस्थेने 'इंडियन इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क' (आयआयआरएफ) २०२६ च्या क्रमवारीत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यामुळे भारतातील एक अग्रगण्य व्यवस्थापन संस्था म्हणून सूर्यदत्तचे स्थान अधिक बळकट झाले आहे. 'एज्युकेशन पोस्ट' मासिकातर्फे प्रसिद्ध झालेल्या 'आयआयआरएफ २०२६'च्या क्रमवारीत, 'एसआयएमएमसी'ने भारतातील टॉप १५ वेगाने वाढणाऱ्या बी-स्कूल्समध्ये देशात १४ वा क्रमांक पटकावला आहे. याशिवाय, भारतातील सर्वोत्तम बिझनेस स्कूल्सच्या एकूण क्रमवारीत 'एसआयएमएमसी'ने राष्ट्रीय पातळीवर ४३ वे आणि राज्य पातळीवर १२ वे स्थान मिळवले आहे.

हे मानांकन सूर्यदत्त संस्थेची शैक्षणिक उत्कृष्टता, नाविन्यता (इन्व्होवेशन), उद्योग क्षेत्राशी सांगड, संशोधन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाप्रती असलेली वचनबद्धता अधोरेखित करते. ही रँकिंग प्लेसमेंट कामगिरी, अध्यापन पद्धती, संशोधन, इंडस्ट्री इंटरॅक्शन आणि जागतिक दृष्टिकोन यांसारख्या निकषांवर आधारित आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न, एआयसीटीई मान्यताप्राप्त आणि महाराष्ट्र शासनाची मान्यता असलेली 'एसआयएमएमसी' संस्था एमबीए (एमबीए), एमसीए (एमसीए), बीबीए (बीबीए) आणि बीसीए (बीसीए) यांसारखे उद्योगाभिमुख अभ्यासक्रम राबवते. संस्थेला 'नॅक'कडून 'ए' ग्रेड पुनर्मानांकित करण्यात आले आहे.

सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड मास कम्युनिकेशनला (एसआयएमएमसी) नुकताच विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून 'स्वायत्तता' (आटोनॉमस) बहाल करण्यात आली आहे. या स्वायत्ततेमुळे संस्थेला उद्योगांच्या गरजेनुसार आधुनिक अभ्यासक्रम तयार करणे आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक पद्धती राबवणे सोपे होणार आहे.

# जामखेडला मोक्कारांची दहशत वाढली ? तरूण मंदिरात दर्शनासाठी गेला असता नारळ फोडण्याचा दगड डोक्यात घातला

■ **जनप्रवास प्रतिनिधी**

**जामखेड :** जामखेड शहरासह तालुक्यात गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांची दहशतीचा आलेख चढता दिसत आहे मंदिरामध्ये दर्शनासाठी गेलेल्या व्यक्तींना

तुम्ही इथं मोटारसायकल का लावली, तुम्ही मंदिरात जायचे नाही असे म्हणत मारहाण करत मंदिरासमोर नारळ फोडण्याचा दगड डोक्यात घातल्याने मुकुंद रघुनाथ पोकळे हे गंभीर जखमी झाले आहेत तर सोडवण्याचा प्रयत्न करणारे शिवाजी मोरे हे देखील जखमी झाले आहेत .मुकंद पोकळे यांची प्रकृती गंभीर जखमी झाल्याने अहिल्यानगर येथे खाजगी दवाखान्यात त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत .

या बाबत शिवाजी मधुकर मोरे वय ५३ वर्षे धंदा वॉशिंग सेंटर रा. पोकळेवस्ती, जामखेड ता. जामखेड जि. अहिल्यानगर यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की

दि १५/०६/२०२६ रोजी दुपारी ०२/०० वा. चे सुमारास फिर्यादी शिवाजी मोरे व मुकुंद रघुनाथ पोकळे रा. पोकळेवस्ती, जामखेड असे दोघे मित्र मुकुंदच्या मोटार सायकलवरून देवदैठण येथे देव दर्शनासाठी गेलो .

परत येतांना बटेवाडी शिवारातील खर्डा रोडवरील मारुती मंदीर येथे दर्शन करिता थांबलो व मोटार सायकल मंदीरा समोर लावली व दर्शना करिता मंदिरात जात असतांना त्याठिकाणी

एक व्यक्ती तेथे उभा होता व तो दारु पिलेला होता तो आम्हाला म्हणाला तुम्ही मोटार सायकल इथे का लावली तुम्ही मंदिरात जायचे नाही असे म्हणत मोटार सायकलची चावी काढुन घेतली व मोटार सायकल खाली पाडली त्यावेळी मोटार सायकलवर बसलेला मुकुंद पोकळे हा पण खाली पडला त्यावेळी फिर्यादीने त्यास उठवत असतांना सदर आरोपीने मंदिराजवळ असलेल्या नारळ फोडण्याचा दगड मुकंद पोकळे याचे डोक्यात मारला व मुकुंद पोकळे जोराचा मार लागल्याने खाली पडले रक्तस्त्राव जास्त होत असल्याने त्यास उचलण्यासाठी फीर्यादी गेले असता आरोपीने तोच दगड फिर्यादीच्या डोक्यात मारला व उजवे खांद्यावर व पायाला दगड मारला .डोक्यातुन ही रक्त येत लागले .तेव्हा फिर्यादीने स्वतःचा शर्ट काढून मुकुंद पोकळे याचे डोक्यावर बांधला व मोटार सायकलवर बसवले त्यानंतर आरोपी व्यक्ती म्हणाला की, माझे नाव बाळु आहे . तुम्ही जर पोलीस स्टेशनला गेले तर तुमचे काही खरे नाही असे म्हणुन दमदाटी केली त्या झटापटीत मुकंद पोकळे याचा विओ कंपनीचा मोबाईल कोठेतीर पडुन गहाळ झाला आहे. त्यानंतर सदर ठिकाणी जमलेल्या लोकांन कडुन सदर व्यक्तीचे नाव बाळु उर्फ दिपक मनोहर खरात रा. बटेवाडी ता. जामखेड जि. अहिल्यानगर असे असल्याचे समजले.

जखमी मुकुंद पोकळे व फीर्यादी मोटार सायकलवर पवार हॉस्पिटल जामखेड येथे आले व तेथुन औषधोपचार घेवुन अहिल्यानगर येथे खाजगी दवाखान्यात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत . मुकुंद पोकळे हा सध्या बेशुध्द असुन तो उपचार घेत आहे.

या प्रकरणी शिवाजी मोरे यांच्या फिर्यादीवरून बाळु उर्फ दिपक मनोहर खरात रा. बटेवाडी ता. जामखेड जि. अहिल्यानगर याच्या विरोधात मुकुंद पोकळे व फिर्यादी जीवे मारण्याचा उद्देशाने मारहाण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

पुढील तपास पोलीस सब इन्स्पेक्टर संपत कन्हेरे करत आहेत .

# राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना शिधापत्रिकांचे वितरण

## प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार : महेश ढवळे

■ **जनप्रवास प्रतिनिधी**

**बारामती :** राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांच्या हस्ते अंत्योदय योजनेंतर्गत तसेच प्राधान्य कुटुंबातील योजनेतील विविध पात्र व गरजू ३५ लाभार्थ्यांना बारामती तहसील कार्यालय येथे आयोजित कार्यक्रमात शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले. प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे या दृष्टीने आयोग कार्यरत आहे, असे श्री. ढवळे यावेळी म्हणाले.

बारामती तालुक्यातील पुरवठा विषयक कामकाजाच्या आढावा बैठकीनंतर या शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले. यावेळी राज्य अन्न आयोगाचे सदस्य रणजीत निंबाळकर, तहसिलदार स्वप्निल रावडे, पुरवठा निरीक्षण अधिकारी बारामती तितिक्षा बारापात्रे, पुरवठा निरीक्षक अशोक कचरे, गोदाम व्यवस्थापक सौरभ इंगळे यांच्यासह संबंधित विभागांचे कर्मचारी व शिधापत्रिकाधारक उपस्थित होते. या कार्यक्रमात अंत्योदय योजनेमध्ये दिव्यांग, परितक्त्या, दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या १५ लाभार्थ्यांना तसेच प्राधान्य कुटूंब योजनेच्या दारिद्र्य रेषेखालील कुटूंबे, भूमीहिन शेतमजूर व ऊसतोड कामगार तसेच अंत्योदय योजनेतून वगळलेले मात्र आर्थिकदृष्ट्या दुर्बल अशा २० गरजू लाभार्थ्यांना शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले. श्री. ढवळे म्हणाले, गरजू नागरिकांना आरोग्याच्या दृष्टीने सकस, स्वच्छ आणि दर्जेदार अन्न मिळाले पाहिजे. या माध्यमातून राज्यातील नागरिक भीकमुक्त, भूकमुक्त आणि कुपोषणमुक्त झाला पाहिजे. एकही नागरिक उपाशी राहणार नाही, या दृष्टीने राज्य अन्न आयोग कार्य करीत आहे. ते पुढे म्हणाले, केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून नागरिकांना त्यांचा लाभ



मिळवून द्यावा व त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार प्राप्त करून द्यावा. शिधापत्रिकेसंबंधित प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढून पात्र नागरिकांना शिधापत्रिका उपलब्ध करून द्याव्यात. एकही नागरिक किंवा बालक अन्नापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. भिक्षेकऱ्यांवर केवळ कारवाई करून प्रश्न सुटणार नाही, तर त्यांच्या संगोपन व समुपदेशनाची गरज आहे. बालभिक्षेकऱ्यांसाठी निवाऱ्यांची व्यवस्था करावी. भीक मागण्यास प्रवृत्त करणाऱ्यांवर कारवाई करावी. भीक मागणे व भीक देणे हा गुन्हा असून भीक मागण्याचे कारण शोधून त्या नागरिकांना शासनाच्या योजनांचा फायदा करुन देणे हेच महाराष्ट्र राज्य अन्न आयोगाचे निकष आहेत. जिल्ह्याबाहेरील ऊसतोड कामगारांची नोंद घेऊन त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, आढावा बैठकीत श्री. ढवळे यांनी निर्देश दिले.

# प्रा. डॉ. विरेंद्र शेटे यांची आयईटीईच्या गव्हर्निंग कौन्सिलवर निवड

■ **जनप्रवास प्रतिनिधी**

**पुणे :** एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी (एडीटी) विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. विरेंद्र शेटे यांची इन्स्टिट्यूशन ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअर्स (आईटीई), नवी दिल्लीच्या २०२६-२०२९ या कार्यकाळासाठी गव्हर्निंग कौन्सिल सदस्य म्हणून निवड झाली आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्रातून या सर्वोच्च राष्ट्रीय संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलवर निवड झालेले ते केवळ दोन प्रतिनिधींपैकी एक आहेत.

शिक्षण, संशोधन, प्रशासकीय नेतृत्व आणि



संस्थात्मक विकास क्षेत्रातील ३२ वर्षांहून अधिक अनुभव असलेल्या प्रा. डॉ. शेटे यांनी उच्च शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांनी १५० हून अधिक संशोधन निबंध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिके व परिषदांमध्ये प्रकाशित केले असून, त्यांच्या नावावर तीन पेटंट्स, पाच कॉपीराइट्स आणि तीन पुस्तके आहेत.

या उल्लेखनीय यशाबद्दल एमआयटी समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, कार्याध्यक्ष व प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालिका डॉ. सुनीता कराड आणि कुलगुरू डॉ. राजेश एस. यांनी प्रा. डॉ. शेटे यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नेतृत्वामुळे राष्ट्रीय स्तरावर एमआयटी-एडीटी विद्यापीठाचा शैक्षणिक आणि तांत्रिक ठसा अधिक भक्कम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## संक्षीप्त वृत्त

### मोहरम व आगामी सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर लोणी औट पोस्ट कोल्हार येथे शांतता समितीची बैठक संपन्न



■ जनप्रवास : प्रतिनिधी

**कोल्हार :** राहता तालुक्यातील कोल्हार भगवतीपुर येथे मोहरम व आगामी सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर लोणी पोलीस स्टेशनचे कोल्हार पोस्ट येथे शांतता समितीची बैठक गावातील मान्यवर व पोलीस कर्मचारी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. याप्रसंगी लोणी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री युवराज आठरे यांनी मार्गदर्शक सूचना केल्या. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वांनी सहभाग घ्यावा असे सांगितले व प्रशासनास सहकार्य करावे.

### 'गंगा माई की बेटियाँ' मधील अमनदीप सिधू सांगते की कशी स्नेहा पारंपरिक टीव्ही नायिकेच्या चौकटीत बसत नाही

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**पुणे :** झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'गंगा माई की बेटियाँ'मध्ये अमनदीप सिधू (स्नेहा) आणि शिझान खान (सिद्धू) यांच्या मुख्य भूमिका असून ह्या मालिकेने हल्लीच हिंदी जीईसी चार्टमध्ये प्रथम क्रमांक मिळवून एक मोठा टप्पा गाठला आहे. या यशामागील एक महत्त्वाचा घटक म्हणजे प्रेक्षकांचे स्नेहा आणि सिद्धू यांच्या प्रेमकथेमध्ये असलेले प्रचंड भावनिक स्वारस्य. जेव्हा हे दोघे वेगवेगळ्या मार्गावर जाणार असे वाटत होते तेव्हा चाहत्यांनी इॲळपसडपशृर्हीढेसशींहशॲ हा ट्रेंड सुरू करून त्यांच्या पुनर्मिलनासाठी जोरदार समर्थन दिले आणि शेवटी त्यांच्या एकत्र येण्याचा क्षण मालिकेतील सर्वांत संस्मरणीय ठरला.

याच दरम्यान, स्नेहाचा अलीकडील प्रवासही प्रेक्षकांच्या मनाला भिडला आहे. सिद्धूसोबतच्या वेगळ्या प्रकारच्या लग्नामुळे तिच्या आयुष्यातील एक महत्त्वाचे वर्ष वाया गेले आणि तिची स्वप्ने मागे पडली, तरीही स्नेहा अन्यायकारक परिस्थितीला नियती म्हणून स्वीकारत नाही. अनेकजण पुढे जाण्याचा पर्याय निवडतील पण ती आपल्या स्वप्नांसाठी लढण्याचा आणि लोकांनी आपल्या कृतींचे परिणाम मान्य करावेत यासाठी त्यांना भाग पाडण्याचा मार्ग निवडते. अमनदीप सिधूच्या मते हाच तिचा गुण तिला इतर पारंपरिक टीव्ही नायिकांपासून वेगळी ओळख देतो. स्नेहा इतर टीव्हीवरील नायिकांपेक्षा कशी वेगळी आहे याबद्दल बोलताना अमनदीप सिधू म्हणाली, मी अनेक खंबीर महिला व्यक्तिरेखा साकारल्या आहेत पण स्नेहाला वेगळी ओळख देणारी गोष्ट म्हणजे तिला जे अन्यायकारक वाटते ते शांतपणे स्वीकारण्यास ती तयार नसते. सध्याच्या कथानकात तिच्या आयुष्याचा मार्ग बदलणाऱ्या आणि तिची स्वप्ने थांबवणाऱ्या इतरांच्या निर्णयांचे परिणाम ती भोगताना दिसते.

### 'तू ही रे दिल में' मध्ये स्वातीची भूमिका साकारत असलेली सिमरन रावल म्हणते, ती नेहमीच्या चौकटीला छेद देते

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**पुणे :** झी टीव्हीने 'वसुधा', 'गंगा माई की बेटियाँ' आणि 'तुम से तुम तक' या मालिकांसह सलग तीन आठवडे टीआरपी चार्टमध्ये अव्वल तीन स्थानांवर वर्चस्व राखले आहे. या यशस्वी प्रवासाला पुढे नेत ही वाहिनी आता आपली नवीन मालिका 'तू ही रे दिल में' सह प्रेक्षकांचे मन जिंकत आहे.

ही मालिका केवळ प्रेमकथा नाही, तर ती नशिब, नाती आणि आयुष्यातील अनपेक्षित वळणांचा शोध घेते. हे कथानक वृंदाभोवती फिरते. ती एक दयाळू मुलगी असून तिचे आयुष्य श्रद्धा आणि नशिबावर आधारलेले असते; पण एका अनपेक्षित घटनेमुळे तिच्या सर्व विश्वासांना तडा जातो. आशा, हृदयभंग, त्याग आणि प्रेमाने भरलेल्या आणि भावनिक स्तर असलेल्या कथानकामुळे 'तू ही रे दिल में' ही मालिका प्रेक्षकांसोबत जोडली जात असून त्यांच्या मनाला भिडत आहे.

अभिनेत्री सिमरन रावल 'तू ही रे दिल में' या मालिकेत स्वातीची भूमिका साकारत असून तिच्यासोबत प्रियांशी यादव (वृंदा) आणि अब्रार काझी (संजय) आहेत. दोन महिला आणि एक पुरुष अशी कथा असेल तर तिसरी व्यक्तीचा स्वभाव खलनायकी असेल अशी प्रेक्षकांची धारणा असते; मात्र स्वातीच्या बाबतीत तसे अजिबात नाही.

### आंतरराष्ट्रीय फादर्स डे : सोनी सब कलाकारांनी वडिलांकडून मिळालेल्या शिकवणींची केली आठवण

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**पुणे :** प्रत्येक यशस्वी कलाकाराच्या मागे एक वडील असतात, ज्यांच्या निःस्वार्थ पाठिंबा, त्याग आणि जीवनशिक्षणामुळे त्यांच्या स्वप्नांना दिशा मिळते. या फादर्स डेच्या निमित्ताने सोनी सबचे कलाकार मनीष वधवा, इकबाल खान, तोरल रसपुत्रा, अर्जुन पुंज, मुस्कान बामने आणि नितीन बाबू यांनी त्यांच्या वडिलांना दिलेल्या शिकवणींची आणि आधाराची भावनिक आठवण शेअर केली. संकटाच्या काळात साथ देणारे, अनिश्चिततेत विश्वास ठेवणारे आणि मुलांना प्रेरणा देणारे हे वडील आजही त्यांचे सर्वात मोठे आदर्श आहेत. इकबाल खान, जो 'यादें' मध्ये डॉ. देव मेहता साकारतो, म्हणतो, दोन मुलींचा पिता झाल्यानंतर माझ्या स्वतःच्या वडिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलला. लहानपणी आपण नेहमीच आई वडिलांचे त्याग समजून घेत नाही, ते आपल्याला सुरक्षित आणि आनंदी ठेवण्यासाठी किती काही करतात हे लक्षात येत नाही. पण आज माझ्या मुलींकडे पाहताना ती जबाबदारी मला खूप स्पष्टपणे समजते. माझ्या वडिलांनी मला दिलेली मूल्यं – प्रामाणिकपणा, संयम आणि इतरांचा आदर – आजही मला मार्गदर्शन करतात, अभिनेता म्हणून आणि पिता म्हणूनही. जर मी माझ्या मुलींना त्यातील थोडं जरी देऊ शकलो, तर ते माझं यश असेल. सर्व वडिलांना फादर्स डेच्या हार्दिक शुभेच्छा.

# शेतकऱ्यांचे डोळे लागले आभाळाकडे, पावसाअभावी खरीप लांबणीवर?

■ जनप्रवास प्रतिनिधी

**टाकळीभान :** मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी मान्सुनच्या आगमनास होत असलेल्या विलंबामुळे श्रीरामपुर तालुक्यातील टाकळीभानसह परीसरातील शेतकरी चिंतेत सापडले आहे. जुन महीन्याचा पंधरवाडा संपला तरी पेरणीयोग्य पाऊस न झाल्याने खरीप हंगामाच्या पेरण्या खोळंबल्या आहे. त्यामुळे सोयाबीन, कपाशी, मका, तुर पिकांच्या पेरण्यांचे नियोजन कोलमडले असुन शेतकर्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहे.



मागील वर्षी मे महीन्यात मान्सुनपुर्व पावसाने चांगली हजेरी लावल्याने जुनच्या पहील्या पंधरवाड्यातच बहुतांश खरीप पेरण्या पुर्ण झाल्या होत्या. त्यादृष्टीने शेतकर्यांनी यावर्षी खरीपासाठी मशागतीची सर्व तयारी पुर्ण केली. मात्र मागील वर्षीच्या तुलनेत यंदा परीस्थिती उलट होऊन जुन अर्धा संपल्यानंतरही पावसाने हजेरी लावलेली नाही. पिके पाण्यावाचुन सुकत असताना शेतीसाठी भंडारदरा धरणातुन सुटलेले आवर्तन शेतकर्यांच्या शेतात पाणी पोहोचण्या आधीच बंद झाले. त्यातच हवामान विभागाने मान्सुनचा वेग मंदावल्याने शेतकर्यांनी पेरणीसाठी घाई करु नये असा सल्ला दिला आहे. त्यामुळे सर्व बाजुने शेतकर्यांवर संकटे निर्माण होऊन खरीप हंगामाचे गणित बिघडत चालले आहे. अल निनोच्या सावटामुळे यावर्षी दमदार पाऊस होईल की नाही, पेरणीसाठी पाऊस किती दिवस वाट बघायला लावणार या प्रश्नाने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे.

**पिके सुकु लागली**

दरम्यान जमीनीतील पाणीपातळी खालावल्याने पिकांना पुरेसे पाणी देणे अवघड झाले असुन ऊस, फळबागा व चारा पिके सुकु लागली आहेत.पाऊस लवकर न पडल्यास पशुधनाचा तसेच नागरीकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होणार आहे.

## कोपरगावात राष्ट्रवादीच्या वतीने राजमाता जिजाऊ यांना अभिवादन

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**कोपरगाव :** स्वराज्याच्या शिल्पकार तथा छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतीदिनानिमित्त कोपरगाव शहरात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले.



यावेळी नगरसेविका गटनेत्या सौ.गौरी पहाडे, सौ. निर्मला आढाव, माजी नगरसेविका सौ. मायादेवी खरे, नगरसेवक हाजी मेहमूद सय्यद, राजेंद्र वाकचौरे, इम्तियाज अत्तार, शैलेश साबळे, संदिप कपिले, बाळासाहेब रुईकर, मंदार पहाडे, सोमेश आढाव, गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनीचे संचालक प्रदीप कुऱ्हाडे, माजी नगरसेवक रमेश गवळी, बाळासाहेब आढाव, दिनकर खरे, अशोक आव्हाटे, सचिन परदेशी, मनोज नरोडे, मुकुंद भूतडा, जावेद शेख, धनंजय कहार, ठकाजी लासुरे, विकास बेंद्रे, राजेंद्र खैरनार, राजेंद्र उशिरे, राजेंद्र बोरावके, योगेश वाणी, शिवाजी लकारे, सिद्धार्थ शेळके, मयुरेश शिंदे, रविंद्र राऊत, वैभव कानडे, प्रशांत मोरे, उमेश दिक्षित आदींसह नागरिक उपस्थित होते.

## मेहेर इंग्लिश स्कूलला लोकनियुक्त नगराध्यक्षा मैथिलीताई तांबे यांची सदिच्छा भेट

### मुलांनी आई-वडील आणि शिक्षकांचा नेहमी आदर बाळगावा- डॉ.सौ.मैथिलीताई तांबे

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** हिंद सेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलने विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे.यासाठी वर्षभर विविध उपक्रम साजरे केले जातात. तसेच मुलींसाठी ही शाळा सुंदर व सुरक्षित आहे.मुलांनी हसत खेळत शिक्षण घ्यावे.मुलांनी चांगला अभ्यास करून प्रगती साधावी. आई वडील व शाळेच्या नावलौकिकात भर घालावी.




मुलांची नेहमीच पालकांकडे काही गोष्टींची मागणी असते. पालक मुलांच्या मागण्या पूर्ण करतात. परंतु पालकांनी दिलेल्या गोष्टींचा गैरवापर मुलांनी करू नये.तसेच मुलांनी आई-वडिलांवर निरपेक्ष प्रेम करावे.त्यांना तुमच्याकडून कोणतीच अपेक्षा नाही.मुलांनी नेहमी चांगला विचार करावा. आई-वडील हे नेहमीच मुलांच्या हितासाठी व त्यांच्या शिक्षणासाठी व त्यांना घडविण्यासाठी कष्ट घेत असतात.मुलांनी नेहमी सकारात्मक विचार करावा.आई वडील व शिक्षक यांचा नेहमी आदर बाळगावा. असे प्रतिपादन संगमनेर नगरपरिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा डॉ.सौ.मैथिली सत्यजीत तांबे यांनी केली आहे. हिंदसेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये संगमनेर नगरपरिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा डॉ.सौ.मैथिली सत्यजीत तांबे यांनी सदिच्छा भेट दिली.यावेळी राजमाता जिजाऊ यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.व शाळेतील मुलींशी मनसोक्त गप्पा मारल्या. याप्रसंगी प्राचार्या अनुरीता झगडे व शाळेतील शिक्षिका व विद्यार्थी,विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा स्वीकार; प्रत्यक्ष उपस्थित नसणार - बिपीन कोल्हे

■ जनप्रवास वार्ताहार

**पुणतांबा :** दरवर्षी माझ्या वाढदिवसानिमित्त नागरिक, कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि हितचिंतकांकडून मिळणारे प्रेम, स्नेह आणि शुभेच्छा ही माझ्यासाठी मोठी प्रेरणा आणि ऊर्जा ठरते. मात्र काही अनिवार्य कारणांमुळे यंदा वाढदिवसाच्या दिवशी मला कोपरगाव येथे उपस्थित राहणे शक्य होणार नसल्याची माहिती संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी दिली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून माझा वाढदिवस हा केवळ शुभेच्छांचा दिवस न राहता सामाजिक बांधिलकी जपणारा अविस्मरणीय दिवस बनला आहे. शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, गरजूंना मदत आणि विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून नागरिक व कार्यकर्ते हा दिवस साजरा करतात, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची व आनंद देणारी बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.



हार, पुष्पगुच्छ किंवा औपचारिक सत्कार स्वीकारण्याऐवजी समाजहिताचे कार्य व्हावे, ही माझी कायम भूमिका राहिली आहे. त्यामुळे यावर्षीदेखील वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊ इच्छिणाऱ्या सर्वांनी शैक्षणिक साहित्य वाटप, पाऊस पडल्यानंतर वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, रक्तदान तसेच अन्य समाजोपयोगी उपक्रम राबवून आपली सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या शुभेच्छा द्याव्यात अशी भावना व्यक्त केली आहे.

यंदा प्रत्यक्ष भेट होणार नसली तरी कोपरगावसह विविध भागातील नागरिक, कार्यकर्ते आणि शुभेच्छुक यांचे प्रेम, आशीर्वाद आणि पाठबळ कायम माझ्या पाठीशी राहील, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.आपण सर्वजण दाखवत असलेली आपुलकी, विश्वास आणि प्रेम हेच माझी खरी ताकद आहे. आपल्या शुभेच्छा आणि सहकार्यामुळेच समाजहिताचे कार्य अधिक जोमाने करण्याची प्रेरणा मिळते, असे बिपीन कोल्हे यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

## बारावी बोर्ड फीचा अपहार; विद्यार्थ्यांची शैक्षणिक फसवणूक केल्याप्रकरणी क्लार्कविरोधात तक्रार

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** बारावीच्या एटीकेटी परीक्षेची फी विद्यार्थ्यांकडून स्वीकारून ती मंडळाकडे ऑनलाइन न भरता अपहार केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, याप्रकरणी प्रगत विद्यालयातील एका लिपिकाविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

सर्जेपुरा येथील रहिवासी व किराणा व्यावसायिक अमोल टिल्लू गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचा मुलगा अंकुश गायकवाड हा गांधी मैदान येथील प्रगत विद्यालयात इयत्ता बारावीमध्ये शिक्षण घेत आहे. १४ मे २०२६ रोजी त्याने बारावी बोर्डाच्या एटीकेटी परीक्षेसाठी ६३० रुपये फी विद्यालयाच्या अकाऊंट विभागात भरली होती.

मात्र, १६ जून रोजी हॉलतिकीट घेण्यासाठी विद्यालयात गेल्यानंतर अंकुशला त्याचा परीक्षा फॉर्म भरलेला नसल्याची माहिती देण्यात आली. याबाबत चौकशी केल्यानंतर त्याच्यासह आणखी चार विद्यार्थ्यांची हॉलतिकिटे आलेली नसल्याचे समोर आले. संबंधित विद्यार्थ्यांमध्ये रोहन माने, सिद्धी गोंधळे, अंकुश गायकवाड आणि गौरव आठरे यांचा समावेश आहे. विद्यार्थी व पालकांनी विद्यालयातील क्लार्क लक्ष्मण पहिलाजरॉय लुहाण यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी फीची रक्कम खर्च झाल्याचे सांगितल्याचा आरोप फिर्यादींनी केला आहे. विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी ६३० रुपये प्रमाणे एकूण ३,१५० रुपये स्वीकारूनही ती रक्कम मंडळाकडे ऑनलाइन जमा करण्यात आली नसल्याने विद्यार्थ्यांची आर्थिक तसेच शैक्षणिक फसवणूक झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, संबंधित क्लार्कविरुद्ध कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. पुढील तपास महिला पोलीस हवालदार निता अडसरे करीत आहेत.

या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला असून, शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

## रोहित कुलकर्णी यांचा सत्कार



■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणतांबा :** येथील रोहित कुलकर्णी याची अग्निविर भारतीय सैन्य दलात निवड झालेले व नुकतेच प्रशिक्षण करून त्यांची देशसेवेसाठी चियाचिन येथे निवड झाल्याबद्दल यानिमित्त रोहित कुलकर्णी येथे सत्कार करण्यात आला. कोपरगाव शिवसेना तालुकाप्रमुख माजी नगरसेवक भरत मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला त्याने विसाव्या वर्षी आपले कर्तृत्वाने भारतीय सैन्य दलात भरती होऊन मानाचा तुरा रोवला असून गावासाठी भुषणावह असल्याचे गौरोवोदगार काढून मोरे यांनी त्याचे कौतुक केले . यावेळी शिवसेनेचे शहर प्रमुख महेश कुलकर्णी, कोपरगाव शहरप्रमुख बालाजी गोरडे, भाऊ वालझडे, शेतकरी सेनेचे बबलु कुलकर्णी, राहुल कुलकर्णी, साई मानकर, सौ शततारका कुलकर्णी नेहा कुलकर्णी, बाल शिवसैनिक चि उत्कर्ष कुलकर्णी हे उपस्थित होते.

# कल्याण रोड परिसरात वाढत्या घरफोडी व गुन्हेगारीमुळे पोलीस गस्त वाढविण्याची मागणी

### नगरसेवक पै.महेश लोंढे यांच्यासह नागरिकांच्या शिष्टमंडळाचे विभागीय पोलीस अधिकारी यांना निवेदन सादर

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरातील कल्याण रोड परिसरात घरफोडी, चोरी आणि इतर गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः गणेशनगर, माधवनगर, भावना-ऋषी सोसायटी आणि साईराम सोसायटी परिसरातील रहिवाशांनी आपल्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करत पोलीस प्रशासनाने या भागात गस्त वाढवावी, अशी मागणी केली आहे.

या पार्श्वभूमीवर नगरसेवक पै. महेश लोंढे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने शहराचे विभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांची भेट घेऊन या मागणीचे निवेदन सादर दिले. यावेळी परिसरातील नागरिक उपस्थित होते. वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना आणि परिसरातील कायदा व सुव्यवस्थेबाबतच्या समस्या याकडे शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, कल्याण रोड भागातील गणेशनगर, माधवनगर, भावना-ऋषी सोसायटी आणि साईराम सोसायटी परिसरात मागील काही काळात



घरफोडी, चोरी तसेच इतर गुन्हेगारी प्रकारांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनात भीती निर्माण झाली असून विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

नागरिकांनी सांगितले की, रात्रीच्या वेळी या भागात संशयास्पद व्यक्तींची वर्दळ वाढल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी अपरिचित व्यक्तींच्या हालचालींबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली असून त्यामुळे रहिवाशांना सतत असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे.

या परिस्थितीमुळे नागरिकांनी पोलीस प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. शिष्टमंडळाने निवेदनात दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवाजीनगर परिसरातील कवडे मळा येथे घडलेल्या खुनाच्या घटनेचाही उल्लेख केला. अशा गंभीर घटनांमुळे नागरिकांमध्ये आणखी भीती निर्माण झाली असून संबंधित प्रकरणात कठोर आणि प्रभावी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# महावितरणच्या कथित वीज चोरी कारवायांविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** महावितरण कंपनीकडून वीज चोरीविरोधी कारवाईच्या नावाखाली कथितपणे सेटलमेंट, आर्थिक वसुली आणि गोरगरीब व्यावसायिकांना लक्ष्य केले जात असल्याचा आरोप करत अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाद्वारे महावितरणच्या ग्रामीण अभियंता कार्यालयासह संबंधित वीज चोरी पथकाच्या कामकाजाची संपूर्ण खातेनिहाय चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली.

प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे यांच्यासह दत्ता वामन, श्रीधर शेलार, विजय वहाडणे, सुभाष काकडे, बबन शिंदे, बाजीराव कलढोणे, राजकुमार पासवान, हरीओम राजपूत, संदीप राजपूत, महेश गुंजकर, राम भोर, अरविंद चौधरी, शंभू यादव, दिनेश यादव, कृष्णा कुमार, चंद्रकांत मगर, कैलास शर्मा, सुधाकर यादव, रवींद्र राजपूत, अरविंद राजपूत आणि मोठ्या संख्येने कामगार व पदाधिकारी सहभागी झाले होते.

आंदोलनकर्त्यांनी महावितरण कंपनीवर वीज कायद्याचा गैरवापर केल्याचा गंभीर आरोप केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, काही कर्मचारी आणि अधिकारी यांच्या साखळीमार्फत खाजगी एजंटांच्या माध्यमातून लाखो रुपयांची आर्थिक उलाढाल होत असून वीज चोरीविरोधी मोहिमेचा वापर



दबावतंत्र म्हणून केला जात आहे. संघटनेने आरोप केला की, एप्रिल महिन्यात वीज चोरीविरोधी विशेष पथकाच्या नावाखाली काही ठिकाणी कारवाई करण्यात आली. मात्र या कारवाईबाबत नाशिक विभागाकडून पथक आले असल्याची माहिती पसरवून निवडक आणि मोजक्याच ठिकाणी छापे टाकण्यात आले. यामध्ये यापूर्वी संबंधित यंत्रणेशी आर्थिक व्यवहार किंवा कथित हप्ते सुरू असलेल्या काही जणांना अभय देण्यात आले, तर इतरांवर कठोर कारवाई करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला.

आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, छोटे व्यावसायिक, हॉटेल चालक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील व्यावसायिकांना लक्ष्य करून त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात दंड आकारण्यात आला. तर दुसरीकडे मोठ्या व्यावसायिकांना तुलनेने कमी दंड आकारून त्यांना संरक्षण दिले जात असल्याचा आरोपही संघटनेने केला. महावितरणच्या काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी कथित तडजोडींच्या माध्यमातून सुरू असलेल्या गैरप्रकारांची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

## प्रजिमा ५ वरील मंडपी नाल्यावरील पुलाचे काम अंतिम टप्प्यात; मागील अनेक वर्षांचा पावसाळ्यात होणाऱ्या त्रासातून लवकरच मुक्तता : आ.आशुतोष काळे

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातील टाकळी-रवंदे (प्रजिमा ५) रस्त्यावरील टाकळी येथील मंडपी नाल्याला पावसाळ्यात पाणी आल्यानंतर नागरीकांना येणाऱ्या अडचणींची दखल घेवून आमदार आशुतोष काळे यांनी मंडपी नाल्यावरील पुलाच्या कामासाठी दिलेल्या १.२० कोटी निधीतून या पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. सुरु असलेल्या कामाची आमदार आशुतोष काळे यांनी नुकतीच पाहणी केली कामाच्या गुणवत्तेबाबत सूचना देत उर्वरित काम शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित अधिकारी व ठेकेदारांना दिले. अत्यंत जुना असलेल्या मंडपी नाल्याच्या पुलावर पावसाळ्यात जवळपास तीन ते चार फुट पाणी येत असल्याने टाकळी, रवंदे तसेच परिसरातील गावांचा संपर्क वारंवार खंडित होत असे. अनेक वेळा हा पूल ओलांडून जात असतांना पुलावरून वाहणारे पाणी कित्येक नागरीकांच्या जीवावर बेतले असता त्या जीवघेण्या संकटातून या नागरीकांचा कसा बसा जीव वाचला आहे. विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयात जाण्यास, शेतकऱ्यांना शेतीमालाची वाहतूक करण्यास मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अनेक वर्षांपासून या नाल्यावर मोठ्या पुलाची मागणी नागरिकांकडून होत होती. या पार्श्वभूमीवर आमदार आशुतोष काळे यांनी या प्रश्नाची गंभीर दखल घेत पुलासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला असून पुलाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. यावेळी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रावण आसने, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष शशिकांत देवकर, विक्रम मांढरे, छगनराव देवकर, शिवाजीराव देवकर, दत्तात्रय देवकर,जितेंद्र देवकर,गणेश पळसकर,जगन्नाथ देवकर, राहुल सोनवणे, बाळासाहेब पाईक, भीमाजी पाईक, बाळासाहेब देवकर, संभाजीराव देवकर, ज्ञानेश्वर जेजुरकर,आसाराम देवकर, भाऊसाहेब देवकर, सुभाष देवकर, दिलीप देवकर,गणेश देवकर, संदिप सहानखोरे, सनी आव्हाड, सोमनाथ देवकर,अमोल देवकर,अक्षय देवकर,नामदेव देवकर,अनिल सोमासे, राजेंद्र देवकर,लालूभाई शेख, बाळासाहेब मालकर आदींसह ग्रामस्थ अधिकारी, संबंधित ठेकेदार उपस्थित होते.

## तीन पोलीस कर्मचारी लाच घेताना जेरबंद

### लाचखोरीने गाजले श्रीगोंदा पोलीस ठाणे; एकाच वेळी तीन कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** कायद्याचे पालन करण्याची जबाबदारी असलेल्या पोलीस दलातीलच तीन कर्मचारी लाच स्वीकारताना रंगेहात सापडल्याने श्रीगोंदा तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) गुरुवारी (दि. १८ जून) दुपारी केलेल्या कारवाईत श्रीगोंदा पोलीस ठाण्यातील पोलीस कॉन्स्टेबल नितीन घाडगे, राजेश जाधव आणि दादा म्हस्के यांना सात हजार रुपयांची लाच स्वीकारताना जेरबंद केले. एकाच वेळी तीन पोलीस कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात अडकल्याने श्रीगोंदा पोलीस ठाणे पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अपघाताशी संबंधित एका प्रकरणाची नोंद करण्यासाठी संबंधित तक्रारदाराकडे या तिघांनी दहा हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केल्यानंतर विभागाने प्राथमिक पडताळणी केली. पडताळणीदरम्यान लाचेची मागणी झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर एसीबीने सापळा रचला. त्यानुसार मागितलेल्या रकमेपैकी सात हजार रुपये स्वीकारताना तिन्ही कर्मचाऱ्यांना रंगेहात पकडण्यात आले. ही कारवाई अहिल्यानगर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपाधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने सापळा रचून यशस्वीरीत्या पार पाडली. कारवाईनंतर संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली असून प्रकरणाचा पुढील तपास एसीबीकडून सुरू आहे. विशेष म्हणजे, श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या इतिहासात एकाच वेळी तीन पोलीस कर्मचारी लाच स्वीकारताना पकडले जाण्याची ही बहुधा पहिलीच घटना मानली जात आहे. त्यामुळे पोलीस विभागाच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. यापूर्वीही श्रीगोंदा पोलीस ठाण्यातील काही कर्मचारी लाचखोरीच्या प्रकरणात कारवाईला सामोरे गेले होते. त्यानंतर अवघ्या काही महिन्यांतच पुन्हा तीन कर्मचाऱ्यांना एसीबीने रंगेहात पकडल्याने पोलीस दलाची विश्वासार्हता धोक्यात येत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. वारंवार उघडकीस येणाऱ्या अशा घटनांमुळे पोलीस ठाण्याच्या प्रतिमेला धक्का बसत असून, भ्रष्टाचाराविरोधातील उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

दरम्यान, एसीबीच्या या धडक कारवाईमुळे केवळ पोलीस विभागातच नव्हे तर विविध शासकीय कार्यालयांमध्येही खळबळ उडाली आहे. लाचखोरीविरोधात कठोर भूमिका घेतल्याचा संदेश या कारवाईतून गेला असून संबंधित प्रकरणाचा पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरू आहे.

## कवडे मळा येथील लक्ष्मण काळे खून प्रकरणाचा २४ तासांत छडा; स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई, चार आरोपी जेरबंद

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** कवडे मळा परिसरात घडलेल्या लक्ष्मण मार्तंड काळे यांच्या निर्घृण खून प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या २४ तासांत छडा लावत चार आरोपींना देहेरे शिवारातून अटक केली आहे. या धडाकेबाज कारवाईमुळे जिल्हा पोलिस दलाच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ जूनच्या रात्री ते १६ जूनच्या पहाटेच्या दरम्यान जाधव मळा, कवडे मळा रोड, नगर-कल्याण रोड परिसरात लक्ष्मण मार्तंड काळे (रा. काळेगाव अमरापूर, ता. शेवगाव) यांची कुऱ्हाडीने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली होती. तसेच फिर्यादी महिलेवरही जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) व १०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे



शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना आरोपींचा तातडीने शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश दिले.

त्यानुसार पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश भोये तसेच पोलीस अंमलदार शाहिद शेख, सुनील पवार, अरविंद भिंगारदिवे, गणेश धोत्रे, योगेश भिंगारदिवे, फुरकान शेख, प्रशांत राठोड, भाऊसाहेब काळे, महिला पोलीस अंमलदार वंदना मोढवे, सोनल भागवत, चिमा काळे तसेच चालक भगवान धुळे व अरुण मोरे यांचे विशेष पथक तयार करण्यात आले.

तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने तपासाची चक्रे वेगाने फिरविण्यात आली. तपासादरम्यान हा खून जमिनीच्या वादातून झाल्याची माहिती समोर आली. आरोपी देहेरे गावातील खंडोबाच्या मळ्यात लपून बसल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर पथकाने सापळा रचून चार आरोपींना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये लक्की उर्फ बाबा राहुल वैराळ (वय १९), करण विशाल शिंदे (वय १८), गणेश उर्फ गणीबाबा मनोज चावरे (वय २२) आणि विशाल उर्फ रानटी रामचंद्र उमाप (वय १८) यांचा समावेश आहे. चौकशीदरम्यान मुख्य आरोपी लक्की वैराळ याने साथीदारांसह जमिनीच्या वादातून खून केल्याची कबुली दिली.

## हंगामा ओटीटीवर 'पर्सनल ट्रेनर २'चे पुनरागमन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** पहिल्या सीझनला मिळालेल्या चांगल्या प्रतिसादानंतर हंगामा ओटीटीने आपली बहुप्रतीक्षित ओरिजिनल वेब सीरिज 'पर्सनल ट्रेनर २' १८ जून २०२६ रोजी प्रदर्शित केली आहे. मुंबईतील उच्चभ्रू फिटनेस क्षेत्राच्या ग्लॅमरस पण तितक्याच निर्दयी वातावरणावर आधारित या मालिकेत टीना दत्ता, आकांक्षा पुरी, पूनम पांडे आणि राहुल सुधीर प्रमुख भूमिकांमध्ये दिसणार आहेत. रहस्य, प्रेम, सत्तासंघर्ष आणि अनपेक्षित घडामोडींनी भरलेली ही सिरीज प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा अनुभव देणार आहे.


मुंबईतील एका प्रतिष्ठित जिममध्ये घडणारी ही कथा आहे. येथे सेलिब्रिटी, इन्फ्लुएन्सर्स आणि शहरातील उच्चभ्रू लोक आपल्या गुप्तपणे व्यायामासाठी येतात. चमकदार वातावरण आणि फिट शरीरांच्या मागे मागे फसवणूक आणि सत्तेचे खेळ सुरू असतात. महत्त्वाकांक्षेच्या झगमगाटाखाली एक वेगळेच धोकादायक जग दडलेले आहे, जिथे आकर्षण हे एक हत्यार बनते, प्रत्येक कृतीत विश्वासघात दडलेला असतो आणि इच्छा माणसाला मर्यादेपलीकडे नेते. नाती बदलतात, मैत्री तुटते आणि परिस्थिती अधिकच धोकादायक बनत जाते. या जगात खरी ताकद केवळ शरीरात नसून, परिस्थिती आपल्या बाजूने वळवण्यात, टिकून राहण्यात आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्यात असते.

## ठेंगे यांचा ॲक्शन मोड; एका दिवसात ७२ वाहनांवर कारवाई; विनानंबर प्लेट दुचाकी, काळ्या फिल्मच्या चारचाकींविरोधात धडक मोहीम; ९४ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारल्यानंतर पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी वाहतूक नियमभंग करणाऱ्यांविरोधात धडक मोहीम हाती घेतली असून, गुरुवार (दि. १८ जून) शहरात आणि परिसरात राबविण्यात आलेल्या विशेष कारवाईत बिननंबर प्लेटच्या दुचाकी तसेच काळ्या फिल्म लावलेल्या चारचाकी वाहनांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली. या मोहिमेत एकूण ७२ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून मोटार वाहन कायद्यानुसार ९४ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

गुन्हेगारी घटनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या तसेच संशयास्पद वाहनांचा माग काढण्यासाठी पोलिसांनी बिननंबर प्लेट वाहनांविरोधात विशेष मोहीम राबवली. या कारवाईदरम्यान नंबर प्लेट नसलेली ४९ दुचाकी वाहने ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आली. वाहनधारकांकडून आरसी बुक सादर करून इंजिन आणि चेसिस क्रमांकांची पडताळणी करण्यात आली. त्यानंतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून जागीच नंबर प्लेट बसविणाऱ्या ३४ वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करून वाहने सोडण्यात आली. मात्र, कागदपत्रांची पूर्तता न झालेल्या १६



वाहनांची पुढील पडताळणी सुरू असून ती पोलीस ठाण्यात जमा ठेवण्यात आली आहेत.

दरम्यान, चारचाकी वाहनांच्या काचांवर अनधिकृत काळी फिल्म लावणाऱ्यांविरोधातही विशेष मोहीम राबविण्यात आली. अशा वाहनांचा वापर अनेकदा बेकायदेशीर कृत्यांसाठी होण्याची शक्यता लक्षात घेऊन वाहनांवरील काळ्या फिल्म काढून टाकण्याची तसेच संबंधित वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

याशिवाय, श्रीगोंदा पोलीस ठाणे हद्दीतील कार सजावट व रेडियम व्यवसायिकांची बैठक घेऊन आरटीओच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या नंबर प्लेट व काळ्या काचा तयार न करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. नियमबाह्य कामे केल्याचे आढळल्यास संबंधितांवरही कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

शहरातील तसेच पोलीस ठाणे हद्दीतील नागरिकांनी आपल्या वाहनांवर पुढील व मागील बाजूस नियमानुसार नंबर प्लेट बसवाव्यात, वाहनांची कागदपत्रे पूर्ण ठेवावीत आणि वाहतूक नियमांचे पालन करावे, अन्यथा कठोर दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल, असे आवाहन पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी केले आहे.

ही कारवाई पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन लिमकर, मनोहर खिळदकर, पवन मोहिते, पोलीस कॉन्स्टेबल आजिनाथ जाधव, गोरख जाधव तसेच होमगार्ड यांच्या पथकाने पार पाडली.

## कोपरगाव नगरपरिषद हद्दीतील वाढीव घरपट्टी रद्द करून पूर्वीप्रमाणेच घरपट्टी आकारावी

### आमदार आशुतोष काळेंची मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीसांकडे मागणी

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

**कोपरगाव :** कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाकडून कोपरगाव नगरपरिषद हद्दीतील नागरिकांना वाढीव दराने घरपट्टी (मालमत्ता कर) आकारण्यात येत असून त्याबाबतच्या अधिकृत घरपट्टी आकारणी पावत्या नागरीकांना देण्यात आल्या आहेत. मात्र या वाढीव घरपट्टी आकारणी बाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त होत असून या बाबत नागरीकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. वाढलेली महागाई त्यामुळे सर्वसामान्य नागरीकांना कुटुंबाचा चरितार्थ चालवितांना मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे कोपरगाव नगरपरिषद हद्दीतील नागरीकांकडून आकारण्यात येणारी वाढीव घरपट्टी (मालमत्ता कर) रद्द करून पूर्वीप्रमाणेच घरपट्टी आकारावी अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली आहे.

आमदार आशुतोष काळे यांनी गुरुवार (दि.१५) रोजी मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेवून याबाबत लेखी निवेदन दिले. दिलेल्या निवेदनात त्यांनी असे म्हटले आहे की, मालमत्तांचे चुकीचे वर्गीकरण, कर निर्धारणातील त्रुटी, आकारणीतील विसंगती तसेच नागरिकांना पुरेशी माहिती



न देता करण्यात आलेली करवाढ याबाबत अनेक हरकती व तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.दुष्काळी परिस्थिती त्यामुळे ठप्प झालेली बाजारपेठ, वाढलेली महागाई, आवाक्याबाहेर चाललेला जीवनावश्यक खर्च अशा आर्थिक अडचणींचा सामना करीत असलेल्या कोपरगावच्या नागरिकांवर वाढीव घरपट्टी लादल्यास त्यांच्या आर्थिक अडचणी अधिकच वाढणार आहेत. असंख्य नागरिकांनी या अन्यायी करवाढी विरोधात नोंदविलेल्या हरकती, तक्रारी व जनतेमध्ये दिवसेंदिवस वाढत चाललेला रोष पाहता हि करवाढ कोपरगावचे नागरीक सोसुच शकत नाही. त्यामुळे सदर वाढीव करवाढीचा पुनर्विचार होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे एकूण परिस्थितीचा विचार करून वाढविण्यात आलेली वाढीव घरपट्टी पूर्णपणे रद्द करून पूर्वीच्या कर आकारणी पद्धतीनुसारच मालमत्ता कर आकारण्याबाबत संबंधित विभागास सूचना द्याव्यात अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे दिलेल्या निवेदनात केली आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चे दरम्यान त्यांनी याबाबत गांभीर्याने विचार करून सकारात्मक निर्णय घेणार असल्याचे सांगितले अशी माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली आहे.

## डॉ. सुजय विखे पाटलांनी दिलेला शब्द केला पूर्ण; विनयभंग प्रकरणातील आरोपीच्या घरावर बुलडोझर

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** राहाता शहरात अल्पवयीन मुलीच्या विनयभंग प्रकरणामुळे संतापाची लाट उसळली असताना पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी कठोर कारवाईची भूमिका घेतलेल्या भाजप प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिलेला शब्द अखेर पूर्ण झाला आहे. प्रशासनाने संबंधित आरोपीच्या अनधिकृत बांधकामावर बुलडोझर चालवत कारवाई केली.



घटना घडल्यानंतर डॉ. सुजय विखे पाटील यांनी पीडित कुटुंबीयांची भेट घेत त्यांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. तसेच महिलांच्या सन्मानाशी खेळ करणाऱ्यांविरोधात कोणतीही दया दाखवली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला होता. त्यानंतर पोलीस, महसूल आणि नगरपालिकेच्या प्रशासनाने संयुक्त कारवाई करत आरोपीच्या घरावर बुलडोझर चालवला. या कारवाईमुळे राहाता शहरासह संपूर्ण तालुक्यात कायद्याचा धाक निर्माण झाला असून महिलांच्या सुरक्षिततेबाबत प्रशासन गंभीर असल्याचा संदेश गेला आहे. गुन्हेगार कोणताही असो, त्याला कायद्यापुढे झुकावेच लागेल, ही भूमिका या कारवाईतून अधोरेखित झाली आहे.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी याप्रसंगी प्रतिक्रिया देताना सांगितले की, पीडितेला न्याय मिळवून देणे आणि समाजात सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही आपली जबाबदारी आहे. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना कोणतीही माफी नाही. कायद्याच्या चौकटीत राहून अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई व्हायलाच हवी. दरम्यान, या कारवाईचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत असून पीडित कुटुंबीयांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.

# निरोगी राहण्यासाठी स्माईल प्लीज



हसण्याचे वरदान केवळ माणसालाच मिळालेले आहे, जे आरोग्यासोबतच इतर अनेक दृष्टीने महत्त्वाचे आहे. हसण्यामुळे केवळ तुमच्या अडचणी किंवा चिंताच नव्हे, तर अनेक आजारही आसपास फिरकत नाहीत. त्यामुळेच तज्ज्ञ नेहमी आनंदी राहण्याचा आणि हसण्याचा सल्ला देतात. जाणून घेऊया हसण्याचे आणखी काही फायदे.

चांगले नाते निर्माण करते - एक हास्य दुसऱ्याशी चांगले संबंध जोडण्यासाठी पुरेसे ठरते. 'द कॅनेडियन स्टॅटिस्टिक्स ऑफिस रिपोर्ट्स'नुसार जे लोक सामाजिक पातळीवर सक्रिय राहतात, ते जास्त निरोगी राहतात. याउलट जे लोक आपल्यापुरतेच मर्यादित किंवा एकटे राहणे पसंत करतात, त्यांच्यासोबत असे घडत नाही.


तरुण बनवते - हसताना स्नायूंची हालचाल होत असल्याने व्यक्ती तरुण व आकर्षक दिसते. जे लोक नेहमी हसत राहतात, ते आपल्या आजूबाजूचे वातावरण आनंदी ठेवतात. हसत राहिल्याने इतरांनाही तुमचा सहवास आवडतो, नसते लोक तुमच्यापासून दूर राहणे पसंत करतात.

तणावापासून मुक्ती - हसत राहिल्याने तणावदेखील जवळपास फिरकत नाही. कोलंबिया विद्यापीठाचे संशोधक मार्क स्टिबिच यांच्या मते, एखादा माणूस दु:खी-कष्टी होऊन बसला तर त्याच्या श्वासोच्छ्वासाचा वेग मंदावेल आणि तो हळूहळू तणावाने घेरला जाईल. तथापि, तो प्रतिकूल परिस्थितीतही हसतमुख राहिला तर तो तणावापासून वाचू शकतो.

रक्तदाबावर नियंत्रण - नेहमी हसतमुख राहिल्यामुळे रक्तदाब कमी होतो. जे लोक तणावाखाली असतात, त्यांना रक्तदाब वाढण्याचा त्रास होतो. त्यामुळे हसा आणि निरोगी राहा.

■■■

# नामस्मरणाने वाढतो आत्मानंद



आवाक्याबाहेर झालेला कर्जबाजारीपणा, परीक्षेतील किंवा प्रेमातील अपयश, कौटुंबिक कलह या साऱ्यांमुळे अनेक जण आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. या साऱ्या नैराश्यात आपण विवेकपूर्ण विचारांना बाजूला ठेवतो. आपला मेंदू योग्य विचारांच्या प्रक्रियेला खंडित करतो.

जेव्हा पोकळी आणि नैराश्य यांचे वर्चस्व मेंदूत अधिक होते तेव्हा आत्महत्येचा किंवा पळून जाण्याचा विचार प्रबळ होतो. एकच विचार मनात ठासून भरला आणि कोणत्याही मार्गाने तो विसरता न आल्याने किंवा त्याचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न जोरकसपणे न झाल्याने मानसिक विकृती निर्माण होते. त्या मानसिक असंतुलनाचा त्रास अयोग्य वृत्तीमध्ये रुपांतरित होतो. ही एक शारीरिक प्रक्रिया आहे. आपली विचार प्रक्रिया जोपर्यंत मेंदूत स्थिर होत नाही, तोपर्यंत ती काहीशी अलिप्तपणे विचार करण्याच्या भूमिकेत आपल्या ताब्यात राहते. परंतु, ती मेंदूत सीमेंट घट्ट व्हावे त्या प्रमाणे घट्ट होत गेली की, विचार आपल्या अधीन न राहता विकाराच्या अधीन होतात. त्यावेळी विवेक जागृती किंवा सद्सद्विवेक बुद्धी क्षीण होते. नामस्मरण करण्यास प्रारंभ केल्यावर त्या नामस्मरणाचे विचार प्रवाह आपल्यात सुरू होतात. ज्या देवतेचे नामस्मरण असते, त्या देवतेचे स्वरूप विचार प्रक्रियेत येऊ लागते, आपली जीवन शैली नामाच्या दिशेला वळते. याचा परिणाम मेंदूतील अयोग्य विचारांवर होतो आणि ते विस्कळीत होतात. सकाळ, दुपार, संध्याकाळ, रात्री जेव्हा, जेव्हा वेळ मिळेल तेव्हा नामस्मरण करण्याने या काळात आपले विकार दूर होतात. नैराश्याचे विचार दुर्बल होत जातात. सहजपणे मनाला स्वस्थता लाभते. आपले शारीरिक, मानसिक, बौद्धिक स्वास्थ्य सुधारते. मुळाला पाणी घातले की ते झाडाच्या सर्वांगाला पोचते, ते झाड पाने-फुले, फळे यांनी बहरते. तसेच नामस्मरणाने जीवनाच्या मुळाशी पाणी पोहचते. आत्मानंदाला वाढवते. जीवनात नैराश्याने आलेली मरगळ झटकण्याची प्रेरणा मिळते. प्राप्त जीवनात पुन्हा ठामपणे उभे राहण्याची सशक्तता नामस्मरणामुळे येते.

■■■

# बऱ्याचदा आपण चांगल्या गोष्टी आणि उपदेश ऐकतो



बऱ्याचदा आपण चांगल्या गोष्टी आणि उपदेश ऐकतो; पण त्याचा आपल्या जीवनावर कोणताही परिणाम होत नाही. जेव्हा एखादी गोष्ट ऐकल्यानंतर विचार प्रक्रिया सुरू होते तेव्हा काही बदलत आहे असे वाटू लागते. बऱ्याचदा आपल्याला असेही जाणवले असेल की, आपण लोकांचे ऐकून त्यांना उत्तरही देतो; पण खरे तर ती चांगली गोष्ट ऐकतच नाही. तेव्हा प्रश्न असा पडतो की, आपण समोरचा जे सांगत असतो ते खरंच ऐकतो का ?

प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञांनी आपल्या संशोधनातून स्पष्ट केले हे की, माणसाला जे ऐकवले जाते तो ते ऐकत नाही; तर त्याला जे ऐकावयाचे असते तेच तो ऐकतो. एखादी व्यक्ती जेव्हा आपल्याला स्वार्थी व धोकेबाज म्हणते व दुसरी व्यक्ती 'सर, आपण खूप चांगले आहात.' म्हणते तेव्हा आपला मेंदू सर्वप्रथम काय ग्रहण करतो ? कोणतीही गोष्ट ऐकून उत्तर देणे म्हणजे ऐकणे नव्हे. जेव्हा आपण एखादी गोष्ट, विचार व कमेंट ऐकतो तेव्हा प्रथम आपल्यात त्याचे उत्तर जन्म घेत नाही. प्रथम आपण विचार करू लागतो.

जेव्हा आपण एखाद्याचे म्हणणे खरोखरच ऐकतो तेव्हा त्यावर विचार करण्यास सुरुवात करतो. एखाद्याच्या बोलण्याला उत्तर देणे म्हणजे ऐकणे नव्हे; तर ते ऐकण्याच्या बदल्यात बोलणे असते. तो आपल्याकडून प्रतिवार, उलटा वार असतो.

जो आपण समोरच्या वाक्याने वा विचाराने खवळून उत्तराच्या रूपात देत असतो. तो जर आपल्याला स्वार्थी वा बेईमान म्हणाला, तर आपणही काहीसे तसेच त्याला बोलतो; पण आपण समोरच्या च्या शब्दांचा विचार करीत नाही. येथे हे महत्त्वाचे नाही की, तो आपल्याला असे का बोलत आहे ? येथे महत्त्वाचे असते आपण समोरच्या व्यक्तीचे बोलणे स्वीकारतो की नाही. त्यामुळे ज्या अर्थाने ऐकण्याची क्रिया व्हायला हवी, तशी क्रिया झाली तर ती खूप क्रांतिकारी असते. आपण पाहातो की, लाखो माणसे वर्षानुवर्षे रोज काही ना काही उपदेश वा अन्य गोष्टी ऐकत असतात. तरीही खूपच कमी माणसांत बदल दिसून येतात. याचे कारण म्हणजे माणे ऐकल्यानंतरची प्रक्रिया अवलंबत नाहीत. जे ऐकवले जात आहे त्यानेच स्वतःला संतुष्ट करीत आहेत. त्यांच्या जीवनात या गोष्टीला कोणताही थारा नसतो की, जे ऐकले आहे, त्याला जीवनात कोणते स्थान मिळाले आहे.

# पत्नीने पतीला कधीही 'डोण्ट टच मी' म्हणू नये

स्वत:च्या मनावरती स्वत:चा ताबा असणे गरजेचे असते पण काही वेळेस तो ताबा राहत नाही. मन एका वेगळ्या वाटेने धावू लागते आणि त्यातून निर्माण होतो एक वेगळ्याच प्रकारचा मानसिकता निर्माण होऊन शारीरिक, भावनिकरित्या स्त्री-पुरुषाकडे तर पुरुष स्त्रीकडे आकर्षित होतात. यात वेगळे असे काहीच नाही.

पती असो वा पत्नी, कोणाचेही इतर स्त्री वा पुरुषांकडे आकृष्ट होणे अस्वाभाविक नव्हे; परंतु तरीही सारे स्त्री-पुरुष विश्वासघातकी का नसतात ? कारण जेव्हा ते स्वत:ला एखाद्याच्या आकर्षणात असल्याचे जाणवतात तेव्हाही आपल्या जीवनसाथीच्या संपर्कात व आकर्षणात राहण्याचा प्रयत्न करतात. त्यांचा हा प्रयत्नच त्यांना वाममार्गाला जाऊ देत नाही.

पत्नीने पतीला कधीही डोण्ट टच मी म्हणून ये. तसेच गुपचुपणे भेटणे ही विवाहबाह्य संबंधातील एक नशा असते. या नशेमुळे परस्परांवरील दोष-उणिवा दिसू शकत नाहीत. हे प्रणय संबंध जसे चटकन जुळतात तसेच लवकर भंगतातही. ही काही दिवसांचीच चमकदूमक असते. जोपर्यंत वैवाहिक जीवनातील सुखदु:खे पत्नी पत्नी एकत्र झेलत असतात.




तोपर्यंत सारे सर्वगुणसंपन्न दिसतात; पण जेव्हा परिस्थिती या उलट होते तेव्हा आपली पत्नी वा पती प्रेमीसारखा मादक दिसू लागतो आणि प्रियकर वा प्रेयसीची अवस्था उबाऊ पती वा नीरस पत्नीसारखी होते. बऱ्याच लग्नाच्या काही एक वर्षांनरत आपल्या वैवाहिक जीवनात साचेबंदपणा येऊ लागल्याचे दिसून येते.

ज्यामुळे बाहेरचे आकर्षण वाढू लागते. हे टाळण्यासाठी आनंद उपभोगण्याचे नवे ढंग शोधायला हवेत. आपल्या दिनचर्येत बदल करायला हवा. कोणत्याही नात्यात नावीन्याचा समावेश होतो. तेव्हा जीवनात रस निर्माण होतो. जेव्हा आपल्याला आपला जीवनसाथी एखाद्याच्या प्रेमात पडला असल्याचे आढळते त्यावेळी विरक्त वा अज्ञान होऊन राहणेही योग्य नव्हे.

आपल्या जीवनसाथीशी अशावेळी मनमोकळेपणाने बोलावे. जेव्हा आपल्या जीवनसाथीला आपल्याला सर्व माहित असल्याचे समजते तेव्हा आपण दोघे एकत्र येऊन समस्येवर तोडगा काढू शकाल. जर आपल्या वैवाहिक जीवनाच्या शांतीसाठी आपण आपल्या जोडीदाराची माफी मागून आपले विवाहबाह्य संबंध बंद कराल, तर आपण विश्वासघातकी होणे टाळू शकाल.

बऱ्याचदा आपण आपल्या जोडीदाराच्या प्रणय-संबंधाचे कारण स्वत:ला मानून स्वत:लाच दोष देता. जर आपण असे स्वत:लाच दोष देत राहाल, तर आपल्या जोडीदाराला मनमानेल तसे वागण्याची सूट मिळेल. यासाठी जर आपल्यात दोष असेल, तर तो आपल्या जोडीदाराला नसांगता दूर करण्याचा प्रयत्न करा.

# प्रोफेशनल लुकसाठी कपड्यांना जास्त महत्व



बऱ्याच जणांना वाटते की, आजच्या प्रोफेशनल युगात शिष्टाचार, शिस्त व नेटकेपणाची किंमत नसते. परंतु आजच्या काळात कंपन्या आपल्या पर्सनल व प्रोफेशनल स्किलसोबतच आपले वागणे, पद्धतशीरपणा व शिस्तही जोखत असतात.

एखादा आपल्याला कसा प्रेझेंट करतो व समोरच्या व्यक्तीशी कसा वागत असतो हेही त्या तपासत असतात.

गेल्या एका दशकांत नव्या तंत्रज्ञानासोबत कंपन्या आपल्या वागण्याकडेही लक्ष देतात. उदाहरणार्थ आपण इंटरनेट, मोबाइलचा वापर कसा करता. म्हणूनच आजच्या काळात यशाचे शिखर गाठण्यासाठी आपल्या स्किलसोबत हे फॅक्टरही ध्यानात घ्यायला हवेत.

**पोषाख** – आजच्या प्रोफेशनल युगात कॅज्युअल लुकमध्ये दिसण्याची पद्धत जास्त आहे. परंतु प्रोफेशनल लुकसाठी कपड्यांना जास्त महत्त्व द्या. तसेच कपडे जास्त भडक व अशोभनीय नसावेत.

**मोबाइलवर बोलणे** – बहुधा लोक ऑफिस, बँक, रेस्टॉरंट, स्टोअरमध्ये मोठ्या आवाजात बोलताना दिसतात. हे लक्षात ठेवायला हवे की, आपला पर्सनल फोन आपल्या खाजगी वापरासाठी आहे व त्याचा इतरांना त्रास होणार नाही.

**परिचय** – बहुधा आपण ग्रुपमध्ये अपरिचित व्यक्तीला पाहून विचलीत होतो. यासाठी आपण एखाद्या बिझनेस वा सामाजिक फंक्शनसाठी गेल्यानंतर तेथे ग्रुपमधील इतरांना आपला परिचय द्यावा व ग्रुपमधील व्यक्तींशी सहजतेने बोलावे.

**बोलणे** – एखाद्या जागी काय बोल-ावे यावरून आपण गोंधळून जातो. यासाठी नियमित वृत्तपत्रे वाचावीत, न्यूज शो पाहावेत. जेणेकरून आपल्याकडे बोलण्यासाठी विषय राहतील.

■■■

# सायकलस्वारांनो जरा जपून...



दररोज प्रदीर्घ काळ सायकल चालवणाऱ्या पुरुषांचे सेक्स लाईफमध्ये बाधा येऊ शकते. कारण नुकत्याच झालेल्या संशोधनात आढळून आले आहे की, अनेक तास सायकल चालवल्यास पुरुष नपुंसक होण्याचा धोका वाढत जातो.

जर्नल ऑफ सेक्युअल मेडिसिनमध्ये छापलेल्या अहवालानुसार जेव्हा सायकलस्वार थेंबाच्या आकाराच्या पुढे लांब टोक असलेल्या सीटवर बसतो तेव्हा त्याच्या शरीराचा एक तृतीयांश भार सायकल सीटच्या पुढे आलेल्या लांब टोकावर पडतो. ज्यामुळे त्यांच्या पेस्विसवर दाब पडतो. यामुळे ३ मिनिटांतच त्याला लिंगापर्यंत पोहचणाऱ्या ऑक्सिजनचे प्रमाण ७०-८० टक्के कमी होते आणि जास्त वेळ सायकलवर बसल्याने तर ऑक्सिजन पोहचणे पूर्णत: बंद होते. त्याचा परिणाम त्याचा सेक्युअल परफॉर्म्सवर पडतो आणि ते नपुंसकतेचे शिकारीही होतो.

परंतु संशोधक असेही म्हणतात की, सारेच सायकलस्वार याची शिकार होतातच असे नव्हे; परंतु ज्यांचे वजन जास्त आहे, त्या सायकलस्वारांना मात्र नंपुसक होण्याचा धोका असतो.

# निरोगी हृदयासाठी दररोज सकाळी व्यायाम करण्याची सवय लावावी

तज्ज्ञांच्या मते, हृदयरोग्याने जर विशेष काळजी घेतली तर हृदयविकाराचा झटका रोखता येऊ शकतो. हृदयासाठी धोक्याची सूचना देणारे प्रसंग आयुष्यात येतात, असे नुकत्याच करण्यात आलेल्या एका संशोधनात आढळून आले आहे. कोणते आहेत हे प्रसंग आणि त्यापासून बचाव कसा करता येईल, याबाबत जाणून घेऊया.

हृदयविकाराचा झटका सोमवारी सकाळीच येतो आणि याचे प्रमाण २० टक्के एवढे आहे, हे शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध झाले आहे. तज्ज्ञांच्या मते, सोमवार हा आठवड्याचा पहिला दिवस असतो, त्यामुळे अनेकजण त्यादिवशी कामावर रुजू होण्याचा विचार करीत चिंताग्रस्त होतात.

हे करावे : रविवारी शारीरिक आणि मानसिकरीत्या शांत व चिंतामुक्त राहावे. तसेच शनिवार आणि रविवारी रात्री उशिरा झोपू नये. कारण अशावेळी शरीराचा थकवा कायम राहील आणि पुढच्या दिवशी रक्तदाबही वाढेल.

जेवणानंतर – एका संशोधनानुसार, जेवणात अती चरबी, अती कबरेदकांचा समावेश केल्यास रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. तसेच रक्तात हृदयविकाराचा झटका येण्याचे प्रमुख कारण असलेल्या रक्तांच्या गाठीचा धोकाही वाढतो.

हे करावे : वरील खाद्यपदार्थांचे सेवन करू नये. जर अवेळी जेवण करण्याची सवय असेल तर दिवसातून थोडे थोडे जेवण करावे.

# द्विधा मन:स्थितीत हातची नोकरीही घालवून बसतात



शिक्षण पूर्ण होताच अनेक तरुण हा एक्सपीरिअन्स शोधण्याचा एक्सपीरिअन्स घेतात. आपल्याला मनोजोगते काम कुठे मिळेल ? काम फुलटाइम करायचे की पार्टटाईम ? नोकरी करायची की धंद्यात पडायचे ? अशा नानाविध प्रश्नांची मालिका घेऊनच या बेरोजगारांची फौज भटकत असते. नेमका कोणता अनुभव आपल्याला उपयोगी पडू शकेल, या प्रश्नाचे उत्तर शोधता-शोधता या तरुणांनी अनेक कंपन्या-संस्थांचे उंबरे पालथे घातलेले असतात. पण, त्यांच्या मनातील चलबिचल काही थांबता थांबत नाही. अचूक वा आपल्याला सुटबेल, कम्फर्टेबल ठरू शकेल, असे काम शोधण्याचा नादात कित्येक तरुण घरबसल्याच पडूनं असतात.आज कोणत्याही क्षेत्रात करिअर घडवायचे असेल वा नोकरी करायची असेल, तर त्या क्षेत्रातला भरपूर अनुभव असावा लागतो. इतकंच कशाला, पहिल्या-वहिल्या नोकरीचा इंटरव्ह्यू देताना याच अनुभवाच्या मुद्यावरून आपलं घोडं अडतं ! त्यामुळे आजच्या या स्पर्धेच्या युगात अनुभवाला अत्यंत महत्त्व आलं आहे.

निर्णयाअभावी, अशा द्विधा मनःस्थितीत हातची नोकरीही घालवून बसतात. जास्त पगार मिळेल या आशेने त्यांचे जॉब फाईंडिंगचे काम सुरू होते. काही काळ लोटल्या नतंर त्यांना एखादा जॉब मिळतो खरा; पण तिथे पगार जास्त आणि हॅरेसमेंट ही जास्त या कचाट्यात ती सापडली जातात. कालचा गोंधळ बरा होता, असे म्हणत त्यांना नाइलाजास्तव त्या ठिकाणी नोकरी करत बसण्याची पाळी येते. असे धरसोडवृत्तीचे अनुभव भविष्यात कुचकामी ठरतात. नोकरीत एकसारखा बदल घडल्याने, वारंवार नवीन वातावरण, नवीन स्टाफ नवीन काम आणि नवीन कार्यस्थळ या गोष्टी वाट्याला येतात. आता, या नवीन गोष्टींबरोबर ॲडजेस्टमेंट न केल्यास आपल्याला त्रास हा होणारच, नाही का ? काही रक्कम वाढावी म्हणून एकसारखी नोकरी सोडणारी व्यक्ती हा शिक्का माथी बसतो, ती गोष्ट वेगळीच !

खरेतर, कोणताही अनुभव वाया जात नसतो.

आपण कोणत्या कंपनीत, संस्थेत काम केले याला फारसे महत्त्व नसून, कोणत्या अनुभवातून काय शिकलो, याला जास्त महत्त्व असते. अनुभवरूपी भांडवलाच्या जोरावरच, तर आपण या स्पर्धेच्या युगात तग धरू शकतो. त्यामुळे, आयुष्याच्या वळणावर मिळेल तो अनुभव गाठीशी बांधा. अनुभव हीच आपली शिदोरी आहे. कोणत्याही अनुभवास कमी लेखू नका. जो वाट्याला येईल त्याचा स्वीकार करा.

आयुष्यात कधी कुठला अनुभव उपयोगाला येईल, हे आपण ओळखू शकत नाही. तरुणपणात, धडधाकड शरीर असल्याने अनेक अनुभव मिळविण्यास आपण उत्सुक असलो पाहिजे. कारण बरेचसे कामाचे अनुभव हे शारीरिक कष्टावर आधारलेले असतात.

Truhome FINANCE

**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)
**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१;
**दूरध्वनी:** १८०० १०२ ४३४५, **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;

**परिशिष्ट-४-ए** [नियम ८(६) ची तरतूद पहा] **स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)कडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात**) सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली तक्त्यात दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दि ११/०७/२०२६.रोजी स.११:३० ते दु १२:३०** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार / तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे: :

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव | मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम तारीख | राखीव किंमत (रु. ) आणि वाढीव बोली | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह ) |
|---|---|---|---|---|
| **१. श्री. परमजीत सिंग अरोरा (कर्जदार)<br>२. श्रीमती सरनजीत कौर अरोरा (सह-कर्जदार)<br>सध्याचा पत्ता :फ्लॅट क्र. २०२, ग्रॅनाडा ए, फोर्टालेझा, सर्व्हे क्र. २१०, कल्याणी नगर, येरवडा, ता. हवेली, जि. पुणे, महाराष्ट्र – ४११००६.<br>तसेच येथे :मालमत्तेचा पत्ता : फ्लॅट क्र. ३०८, निर्माण सिरीन, बी-विंग, सर्व्हे क्र. २४, गोदरेज होरायझन समोर, उंड्री, जि. पुणे, महाराष्ट्र – ४११०२८. कर्ज खाते क्र. : SHLHPUNH0000454.**<br>**ताबा दिनांक व ताबा प्रकार**<br>**२१ डिसेंबर २०२३ आणि प्रत्यक्ष ताबा.**<br>**ज्ञात अधिभार** ज्ञात नाही | मागणी नोटीस तारीख : १७.०३.२०२३. कर्ज खाते क्र.SHLHPUNH0000454 अंतर्गत दिनांक १६/०३/२०२३. रोजी रु. ३२,६२,४४८/- (फक्त बत्तीस लाख बासष्ट हजार चारशे अठ्ठेचाळीस रुपये). सदर नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत करारातील दराने लागू होणाऱ्या पुढील व्याजासह. | रु. २३,००,०००/- (फक्त तेवीस लाख रुपये).<br>**बोली वाढविणे :** रु. ५,०००./- आणि त्यापटीने<br>**बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )**<br>रु. २,३०,०००/- (फक्त दोन लाख तीस हजार रुपये).<br>**ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : १० जुलै, २०२६. वेळ सकाळी १० ते सायं ५.००** | **११.- जुलै- २०२६.<br>वेळ. सकाळी ११.३०. ते दुपारी १२.३०. वाजेपर्यंत.** | **मयुरेश जाधव ९८३३०१७२२१<br>गणपत कवठेकर ९७६४३३८८२२<br>पाहणीची तारीख : ०८.०७.२०२६ वेळ : दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत.** |

**संपत्तीचे विवरण**

सर्व हक्क व हितसंबंधांसह असलेला फ्लॅट क्र. ३०८, क्षेत्रफळ ७६.११ चौ. मीटर म्हणजेच ८१९.०० चौ. फूट, "निर्माण सिरीन" या प्रकल्पातील बी विंगच्या तिसऱ्या मजल्यावर, सर्व्हे क्र. २४, हिस्सा क्र. १/१ असलेल्या जमिनीवर बांधलेला, मौजे उंड्री, ता. हवेली, जि. पुणे – ४११०६० येथे स्थित असलेली मालमत्ता.चतु:सीमा (तांत्रिक अहवाल / स्थळ पाहणीनुसार) :उत्तरेस : फ्लॅट क्र. ३०७ दक्षिणेस : डक्टपूर्वेस : मोकळी जागापश्चिमेस : फ्लॅट क्र. ३०५.

**०१. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाउसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.**
**०२. इच्छुक बोलीदारांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात बँकेचे नाव- ॲक्सिस बँक लिमिटेड शाखा: वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई बँक खाते क्रमांक-चालू खाते क्रमांक ९११०२००४५६७७६३३ आयएफएससी कोड- यूटीआयबी ००००२३० येथे जमा करावी:**

ठिकाण - पुणे.
दिनांक - १९.०६.२०२६.

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

# बुलेट ट्रेनने मुंबई-पुणे ४८ मिनिटांत; महाराष्ट्राला जागतिक पुरवठा साखळीचे केंद्र बनवणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : मुंबई-पुणे बुलेट ट्रेनमुळे दोन्ही शहरांतील प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत होणार असून मुंबई आणि पुणे हे एकात्मिक आर्थिक क्षेत्र म्हणून विकसित होतील. तसेच जेएनपीटी आणि वाढवण बंदरांना समृद्धी महामार्गालगत स्वतंत्र मालवाहतूक रेल्वे कॉरिडॉरद्वारे जोडून महाराष्ट्राला जागतिक पुरवठा साखळीचे महत्त्वाचे केंद्र बनविण्याचा राज्य शासनाचा संकल्प असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

रांजणगाव औद्योगिक वसाहतीतील जबिल कंपनीच्या अत्याधुनिक उत्पादन विस्तार प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय रेल्वे, माहिती व प्रसारण तसेच इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव, आमदार दिलीप वळसे पाटील, ज्ञानेश्वर कटके, राज्याचे उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, जॅबिलचे कार्यकारी उपाध्यक्ष (ऑपरेशन्स) अँडी प्रिस्टली, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार कौस्तुभ धवसे, कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक



बी. एन. शुक्ला, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी तसेच एमआयडीसीच्या सह मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र देशातील डेटा सेंटर हब म्हणून उदयास येत असून भारतातील सुमारे ६० टक्के डेटा सेंटर क्षमता राज्यात विकसित होत आहे. त्यामुळे डेटा सेंटर, डीप टेक, इलेक्ट्रॉनिक्स आणि चिप उत्पादनाशी संबंधित संपूर्ण उद्योग परिसंस्था महाराष्ट्रात निर्माण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे त्यांनी सांगितले.

इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीमध्ये महाराष्ट्राने अग्रस्थान मिळविल्याचे नमूद करत मुख्यमंत्री म्हणाले की, केंद्र सरकारने राज्याला दिलेल्या इलेक्ट्रॉनिक्स क्लस्टरमुळे उद्योग क्षेत्राला नवी गती मिळणार आहे.

यावेळी त्यांनी जेएनपीटी आणि उभारणीच्या अंतिम टप्प्यात असलेल्या वाढवण बंदराला समृद्धी महामार्गालगत स्वतंत्र मालवाहतूक रेल्वे कॉरिडॉरद्वारे जोडण्याचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासमोर मांडल्याची माहिती दिली. हा कॉरिडॉर जालना, वर्धा येथील ड्राय पोर्ट आणि पुढे गडचिरोलीपर्यंत जोडला जाणार असून त्यामुळे लॉजिस्टिक्सचा खर्च ७ ते ८ टक्क्यांपर्यंत कमी होईल. यामुळे महाराष्ट्र जागतिक पुरवठा साखळीतील प्रभावी केंद्र म्हणून उदयास येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात महाराष्ट्राचा सुमारे १४ टक्के वाटा असून निर्यातीत हा वाटा २० टक्क्यांपर्यंत असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

जबिलच्या या अत्याधुनिक प्रकल्पात दिसणारी अचूकता, प्रगत तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील नवकल्पना भारतातील उत्पादन क्षेत्राच्या वाढत्या सामर्थ्याचे प्रतीक आहेत. भारत आज इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि निर्यातीमध्ये मोठी झेप घेत असून मोबाईल उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर झाल्यानंतर आता सेमीकंडक्टर आणि चिप निर्मिती क्षेत्रातही देशाने भक्कम पाऊल टाकले आहे, असेही श्री.फडणवीस यांनी नमूद केले.

राज्यातील उद्योगांना शासन भागीदार म्हणून पाहत असून व्यवसाय सुलभतेसाठी आवश्यक असलेले सर्व सहकार्य दिले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. रांजणगाव परिसरात महावितरण (एमएसईडीसीएल) चे स्वतंत्र विभागीय कार्यालय स्थापन करण्यबाबत सकारात्मक निर्णय घेणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. उद्योग क्षेत्राला आवश्यक असलेली कायदा आणि सुव्यवस्था कायम राखण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगत या औद्योगिक पट्ट्यात पोलिस यंत्रणा अधिक बळकट करण्यात येईल आणि कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी जबिलच्या पुणे येथील अत्याधुनिक प्रकल्पाचे कौतुक करत भारताला जागतिक इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्रातील विश्वासार्ह भागीदार बनविण्याचा निर्धार व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेल्या जमीन सुधारणांमुळे आणि महाराष्ट्र शासनाच्या जलद निर्णय प्रक्रियेमुळे उद्योगांना मोठी चालना मिळाल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन उद्योग १३ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असून इलेक्ट्रॉनिक्स ही भारताची तिसरी सर्वात मोठी निर्यात श्रेणी बनल्याचे त्यांनी नमूद केले.

भारताला इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीत जगातील अग्रगण्य राष्ट्र बनविण्यासाठी गुणवत्ता, कौशल्य विकास आणि उच्च-अचूकता उत्पादनावर भर देण्याचे आवाहन करताना त्यांनी देशात चार सेमीकंडक्टर प्रकल्प कार्यान्वित होत आहेत. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर रेल्वे प्रकल्प सुरू असून मुंबई-पुणे बुलेट ट्रेनमुळे हा प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत, तर पुणे-हैदराबाद प्रवास सुमारे २ तास ८ मिनिटांत पूर्ण होईल, असे सांगून देशात मोठे औद्योगिक आणि पायाभूत परिवर्तन घडत असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळांच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे, या योजनांचा लाभ घेण्याकरिता इच्छुकांनी र्ह्ीींिः//ंर्पीक्षपींवल. ेस/ या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

पैलवान कै. मारुती चव्हाण-वडार, राजे उमाजी नाईक, परमपुज्य गंगानाथ महाराज, ब्रम्हलीन आचार्य दिव्यानंद पुरीजी, श्रीकृष्ण आणि विणकर समाज आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी) अंतर्गत बीज भांडवल कर्ज योजना, एक लाख रूपये थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना राबवून पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो. व्याज परतावा योजनेत संपूर्ण कर्ज बँकेचे राहणार आहे. तथापि कर्जाचे हप्ते नियमितपणे भरल्यास कमाल १२ टक्क्यापर्यंतचे व्याज लाभार्थीचा बँक खात्यावर महामंडळाच्यावतीने जमा करण्यात येणार आहे. एक लाख थेट कर्ज योजनेमध्ये संपूर्ण कर्ज महामंडळाकडून दिले जाणार आहे. लाभार्थीने २ हजार ८५ रुपायांचा नियमितपणे ४८ समान मासिक हप्त्यामध्ये परतफेड केल्यास लाभार्थ्यांना व्याज अदा करावे लागणार नाही, परंतु थकित हप्त्यांवर द.सा.द.शे. ४ टक्के व्याजदर आकारण्यात येईल.

अधिक माहितीसाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बी-विंग, सर्वे क्र. १०५/१०६, मेंटल हॉस्पिटल कॉर्नर, आळंदी रोड, येरवडा, पुणे. तसेच कार्यालयाच्या ०२०-२९७०३०४९ या संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक किरण गिऱ्हे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

# बालकांना पोषणासह चविष्ट आहार; घरपोच आहारात नव्या पाककृतींचा होणार समावेश : मंत्री आदिती तटकरे

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : अंगणवाडीतील बालकांसह गरोदर महिला, स्तनदा माता तसेच आकांक्षित जिल्ह्यांतील किशोरवयीन मुलींना देण्यात येणाऱ्या घरपोच आहारामध्ये पोषणमूल्यांसोबतच चवीलाही प्राधान्य देत नवीन आणि रुचकर पाककृतींचा समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत राज्यातील ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर महिला, स्तनदा माता तसेच आकांक्षित जिल्ह्यांतील किशोरवयीन मुलींना देण्यात येणाऱ्या घरपोच आहारासंदर्भात मंत्रालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री तटकरे यांनी स्वत: पोषण आहाराचा आस्वाद घेत त्याच्या गुणवत्तेची पाहणी केली. बैठकीस महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आयुक्त माधवी सरदेशमुख, आयुक्त डॉ. जगदीश मणियार (दूरदृश्य



प्रणालीद्वारे), सहसचिव वी. आर. ठाकूर, अवर सचिव सुनील सरदार, प्रसाद कुलकर्णी, सह आयुक्त वर्षा पवार, उपायुक्त संगीता लोंढे, विजय क्षीरसागर, जामसिंग गिरासे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, केंद्र शासनाच्या निकषानुसार सध्या घरपोच आहार प्रीमिक्स स्वरूपात वितरित केला जातो. मात्र, लाभार्थ्यांकडून मिळालेला प्रतिसाद, क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या सूचना तसेच तज्ज्ञांच्या शिफारशी लक्षात घेऊन या आहारामध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत.

# सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांतील वाढीव खाटांनुसार पदनिर्मितीचा सुधारित प्रस्ताव लवकरच; रुग्णसेवा अधिक सक्षम होणार : मंत्री हसन मुश्रीफ

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि संलग्न रुग्णालयांमध्ये वाढत्या रुग्णभाराच्या पार्श्वभूमीवर वाढीव खाटांनुसार आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी पदनिर्मितीचा सुधारित प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात येणार असल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. यामुळे रुग्णसेवा अधिक सक्षम होण्याबरोबरच वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ताही उंचावणार असल्याचे त्यांनी सांगितले.

वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या वाढीव खाटांबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. त्यावेळी मुश्रीफ बोलत होते.यावेळी वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी, संचालक पल्लवी सापळे, उपसचिव संदीप ढाकणे, वैद्यकीय शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत राज्यातील रुग्णालयांमधील वाढता रुग्णभार, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निकषांनुसार आवश्यक पदांची उपलब्धता आणि भविष्यातील गरजांवर चर्चा करण्यात आली.



राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांमध्ये दरवर्षी एक कोटीपेक्षा अधिक बाह्यरुग्णांना तसेच १० लाखांहून अधिक आंतररुग्णांना सेवा दिली जाते. या रुग्णालयांमध्ये रुग्णसंख्या सातत्याने वाढत असून उपलब्ध मनुष्यबळावर ताण येत आहे. त्यामुळे रुग्णसेवेची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी आणि अध्यापन व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी अतिरिक्त पदनिर्मितीची आवश्यकता निर्माण झाली असल्याचे मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले.

मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि संलग्न रुग्णालये राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग आणि आयपीएचएसच्या निकषांनुसार कार्यरत आहेत. वाढत्या रुग्णसंख्येमुळे आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करणे ही काळाची गरज आहे. रुग्णांना दर्जेदार व तत्पर आरोग्यसेवा मिळावी आणि वैद्यकीय विद्यार्थ्यांना उत्कृष्ट प्रशिक्षण मिळावे यासाठी शासन कटिबद्ध आहे.

वाढीव सुधारित प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. वित्त विभागाशी झालेल्या चर्चे नंतर हा प्रस्ताव आकृतिबंधाच्या निकषांनुसार अधिक परिष्कृत करून सादर करण्यात येणार आहे.

# 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर पशुपालकांनी चारा नियोजनाकडे विशेष लक्ष द्यावे : आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : जागतिक हवामान बदलाचा परिणाम म्हणून निर्माण होणाऱ्या 'एल निनो'च्या संभाव्य संकटामुळे आगामी काळात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या परिस्थितीचा पशुधन व दुग्धोत्पादनावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी राज्यातील सर्व पशुपालकांनी आतापासूनच सतर्क राहून चारा पिकांचे नियोजन करावे, असे आवाहन आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

पशुपालकांना या संकटाचा सामना समर्थपणे करता यावा, यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुपालक व शेतकरी यांना पोषक व बहुउद्देशीय चारा पिकांची निवड करण्याचे आवाहन करण्यात आले




आहे. गाई व म्हशींच्या उत्तम आरोग्यासाठी आणि दूध उत्पादनात घट होऊ नये म्हणून पशुपालकांनी पोषक असणाऱ्या चारा पिकांची लागवड करावी. अशी पिके निवडावीत ज्यातून मुख्य शेतमाल (धान्य/उत्पादन) तर मिळेलच, सोबतीला जनावरांच्या पोषणासाठी दर्जेदार चाराही उपलब्ध होईल.

शेतकऱ्यांनी आपल्या शेताच्या बांधावर अथवा पडीक जमिनीवर येणारे नैसर्गिक गवत वाया न घालवता त्याचे योग्य जतन करावे. पावसाची ओढ किंवा टंचाईच्या संकट काळात हेच गवत जनावरांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा आधार ठरणार आहे. भविष्यातील संभाव्य टंचाई टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या उपलब्ध जमिनीवर मोठ्या प्रमाणावर चारा उत्पादनावर भर द्यावा. उत्पादित केलेला अतिरिक्त चारा 'मुरघास' किंवा सुक्या चाऱ्याच्या स्वरूपात साठवून ठेवावा, जेणेकरून जनावरांच्या खाद्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. पशुसंवर्धन विभागामार्फत 'एल निनो'च्या संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी पशुपालक शेतकरी बांधवांना विविध माध्यमातून मार्गदर्शन करण्यासाठी विभागाच्या वतीने नियोजन करण्यात येत आहे. या संभाव्य संकटकाळात पशुधनाची काळजी घेण्यासाठी पशुसंवर्धन विभाग सक्षम असून, कोणत्याही शंका तसेच अडचणी संदर्भात पशुपालकांनी १९६२ या कॉल सेंटर नंबरवरुन माहिती व पशुवैद्यकीय सेवा प्राप्त करून घ्याव्यात, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येत आहे.

डॉ. किरण पाटील, आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य: एल निनोच्या सावटामुळे उद्भवणाऱ्या संभाव्य टंचाईचा फटका आपल्या पशुधनाला बसू नये, ही आपली प्राथमिकता असली पाहिजे. योग्य नियोजन, पोषक चारा पिकांची निवड आणि उपलब्ध चाऱ्याची साठवणूक करून आपण पशुधनाचे पोषण आणि आपले आर्थिक उत्पन्न दोन्ही सुरक्षित ठेवू शकतो. सर्व पशुपालकांनी या आवाहनाचा गांभीर्याने विचार करून तातडीने अंमलबजावणी करावी.

# महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजनेच्या रुग्णांचे स्वागत 'वेलकम किट' ने करावे : मंत्री प्रकाश आबिटकर

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या स्वागतासाठी तयार करण्यात आलेल्या 'वेलकम किट'ने प्रत्येक रुग्णाचे स्वागत करण्यात यावे तसेच आरोग्यमित्र आणि रुग्णालय प्रशासनाने रुग्णांना आवश्यक ती मदत, मार्गदर्शन आणि सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर यांनी केले.

महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात राज्यातील अंगीकृत रुग्णालयांची बैठक आरोग्य भवन, मुंबई येथे आरोग्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. राज्य स्तरीय अधिकारी येथे राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, अंमलबजावणी सहाय्य संस्थाचे प्रतिनिधी, शासकीय व खाजगी अंगीकृत रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी मंत्री आबिटकर म्हणाले की योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना कोणतीही आर्थिक मागणी न करता पूर्णपणे



मोफत व दर्जेदार उपचार मिळणे ही सर्व संबंधित यंत्रणांची सामूहिक जबाबदारी आहे. कोणत्याही परिस्थितीत पात्र रुग्णाला उपचार नाकारले जाणार नाहीत, याची दक्षता घेणे आवश्यक असून योजनेची प्रभावी आणि काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी आवश्यक ती पावले उचलावीत, असे निर्देश त्यांनी दिले.

आरोग्यमंत्र्यांनी पुढे सांगितले की, रुग्णांना योजनेंतर्गत सेवा मिळवून देण्यासाठी आरोग्यमित्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे आरोग्यमित्रांची नियुक्ती, प्रशिक्षण आणि क्षमता विकास यावर विशेष भर देणे गरजेचे आहे. रुग्णांना योजनांचा लाभ सहज आणि वेळेत मिळण्यासाठी आरोग्यमित्रांनी अधिक संवेदनशीलतेने कार्य करावे.

## कला विश्व

# 'लगान' चित्रपटाने माझं करिअर बरबाद केलं; २५ वर्षांनंतर आमिर खानच्या सिनेमाबद्दल अभिनेत्याचा मोठा खुलासा

आशुतोष गोवारीकर यांच्या 'लगान' (२००१) या ब्लॉकबस्टर चित्रपटाने इतिहास रचला होता. या चित्रपटात काम करणाऱ्या प्रत्येक कलाकाराच्या करिअरला नवी दिशा मिळाली. मात्र, अभिनेता सिनेमात 'बाघा' ही भूमिका करणाऱ्या अमीन हाजी यांच्याबाबत असं घडलं नाही. अमीन हाजी यांना वाटतं की आमिर खानच्या या चित्रपटाने त्यांचं करिअर बरबाद केलं. अर्थात, या चित्रपटाने त्यांचं वैयक्तिक काहीच नुकसान झालं नाही, पण नंतर त्याहून मोठा हिट चित्रपट त्यांना करता आला नाही. चित्रपट रिलीज होऊन आता २५ वर्षे झाली आहेत, तरीही अमीन यांच्यामते 'लगान'मधील मुक्या



'बाघा'इतकी प्रभावी आणि ताकदीची भूमिका त्यांना पुन्हा कधीच मिळाली नाही. लगानने माझं करिअर बरबाद केलं, हेच सत्य आहे, असं अमीन म्हणाले. अभिनेता अमीन हाजी यांनी या परिस्थितीचे वर्णन करण्यासाठी जगजीत सिंग यांच्या 'हजारों ख्वाहिशें ऐसी' या गझलच्या ओळी वापरल्या. ते म्हणाले, हजारों ख्वाहिशें ऐसी के हर ख्वाहिश पे दम निकले बहोत निकले मेरे अरमां, लेकिन फिर भी कम निकले.

'लगान'नंतरही अमीन यांना अनेक सिनेमाच्या ऑफर्स आल्या, पण त्यापैकी एकही भूमिका किंवा चित्रपट आमिर खानच्या 'लगान'च्या जवळपास जाणारी नव्हती. अमीन म्हणाले, 'लगान' संपल्यावर मला अभिनय करण्याची इच्छाच उरली नव्हती. मला ऑफर्स येत होत्या, पण चित्रपटाची स्क्रिप्ट किंवा माझी भूमिका 'लगान'सारखी प्रभावी वाटत नव्हती. एका टप्प्यावर आशुतोष गोवारीकर आणि माझी पत्नी शार्लटने मला विचारलं, 'तू आता पुढे काय करणार?' त्यावर मी म्हणालो, 'तुम्हीच मला सांगा,' कारण मला त्या सुमार ऑफर्स स्वीकारायच्या नव्हत्या. अमीन पुढे म्हणाले, मुळात, मला 'लगान'मुळे जो आदर-सन्मान मिळाला होता, तो मला खराब करायचा नव्हता. तसेच मी काही खूप मोठा किंवा उत्तम अभिनेता नाही. 'लगान'ची उत्तम स्क्रिप्ट, दिग्दर्शक आणि तिथली टीम यामुळेच मी चांगलं काम करू शकलो. त्या सर्वांनी मला खूप मदत केली. अमीन यांना भीती वाटत होती की इतर चित्रपटांच्या सेटवर लोकांना समजेल की ते काही फार मोठे अभिनेते नाहीत. अमीन यांची ही मन:स्थिती पाहून दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांनी त्यांच्यासमोर एक प्रस्ताव ठेवला. त्यांनी अमीन यांना चित्रपट लिहिण्याबद्दल विचारलं. तो चित्रपट म्हणजे शाहरुख खान मुख्य भूमिकेत असलेला 'स्वदेश' (२००४) होता.

# सैफ अली खानबरोबर घटस्फोट झाल्यानंतर अमृता सिंगने दुसरे लग्न का केले नाही? स्वत:च केलेला खुलासा

सैफ अली खान लवकरच 'हैवान', 'रेस ४', या सिनेमांतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वीच सैफ अली खानचा कर्तव्य हा सिनेमा नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला होता. अभिनेता त्याच्या व्यावसायिक आयुष्याबरोबरच त्याच्या खासगी आयुष्यामुळेदेखील मोठ्या प्रमाणात चर्चेत असतो. सैफ अली खानने २०१२ मध्ये करीना कपूरबरोबर लग्नगाठ बांधली. त्याआधी ते ५ वर्षे रिलेशनशिपमध्ये होते. २००७ मध्ये त्यांनी एकमेकांना डेट करायला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी लग्न केले. त्यांना आता दोन मुले आहेत. २०१६ मध्ये त्यांना पहिला मुलगा झाला. त्याचे नाव तैमुर असे आहे. तर, २०२१मध्ये त्यांना दुसरा मुलगा झाला. त्याचे नाव जेह असे आहे. करीना व सैफ प्रमाणेच तैमुर व सैफचा मोठा चाहतावर्ग आहे. त्यांची एक झलक पाहण्यासाठी चाहते उत्सुक असतात. करीनाबरोबर लग्न करण्याआधी सैफ अली खानने अभिनेत्री अमृता सिंगबरोबर लग्नगाठ बांधली होती. सैफ व अमृता सिंग यांची भेट 'बेखुदी'च्या सेटवर झाली होती. जरी सैफला चित्रपटातून बाहेर काढले असले तरी सैफ व अमृताला एकमेकांच्या संपर्कात होते. ते एकमेकांच्या प्रेमात पडले. त्यांच्यात १२ वर्षांचे अंतर होते. १९९१ मध्ये त्यांनी लग्न केले. सैफ अली खान २१ वर्षांचा होता. त्यावेळी अमृता सिंगचे वय ३३ वर्षे होते. त्यांना दोन मुले आहेत. लग्नाच्या १३ वर्षांनंतर त्यांनी वेगळे होण्याचा निर्णय घेतला. २००४ मध्ये त्यांनी



घटस्फोट घेतला. घटस्फोटानंतर सैफ अली खानने दुसरे लग्न केले असले तरी, अमृता सिंगने दुसरे लग्न केले नाही. याबद्दल तिला एका मुलाखतीत तिला विचारले होते की, तुम्ही दुसरे लग्न करणार का? याबद्दल ती म्हणालेली, मी १६ वर्षांची नाही. त्यामुळे मला लग्न करायचे आहे की नाही,याबद्दल माझ्या मनात गोंधळ नाही. प्रामाणिकपणे सांगायचे तर मला वाटत नाही की मी लग्न करेन. पण, माहित नाही की पुढे काय होईल. एक पुरुष जे मला देऊ शकतो, ते सगळे माझ्याकडे आहे. काही गोष्टी सोडल्यास माझ्याकडे सगळेच आहे, त्यासाठी मी लग्न करण्याची गरज नाही. पुढे तिला विचारले की जर दुसऱ्यांदा लग्न केले तर तुम्ही पुन्हा करिअर सोडणार का? याबद्दल अभिनेत्री म्हणालेली, कदाचित म्हणून मी दुसरे लग्न करणार नाही. कारण- मला माहित आहे की माझे बिल इतर कोणीही भरणार नाही आणि मला काम करत राहावं लागणार आहे, असे म्हणत अभिनेत्रीने दुसरे लग्न करणार नसल्याचे सांगितले होते. दरम्यान, सैफ व अमृता यांना दोन मुले आहे. मुलगी सारा अली खान आणि मुलगा इब्राहिम अली खान दोघेही आई-वडिलांप्रमाणे चित्रपटसृष्टीत काम करत आहेत. सारा व इब्राहिमचे करीना व तिच्या मुलांबरोबर उत्तम बॉण्डिंग असल्याचे पाहायला मिळते.

* मुख्य संपादक - संजय प्रल्हाद भोकरे * संपादक -सिद्धार्थ संजय भोकरे * सरव्यवस्थापक - सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन - ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com